cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३२३ | मंगळवार, दि.१८ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### नानांची ऑफर अन् राजकिय धुळवड

बुरा ना मानो होली है'च्या नावाखाली कोणत्याही प्रकारची चेष्टामस्करी करण्याचा परवाना दिला असला, तरी राजकारणात मुरलेल्या राजकीय नेत्यांनी होळीच्या निमित्ताने अशा प्रकारची चेष्टामस्करी करावी का, हा मात्र वादाचा विषय ठरू शकतो. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या एका विधानामुळे विनाकारणच खळबळ माजली आणि नंतर आपण गमतीने हे विधान केले असा खुलासा त्यांनी केला. त्यांच्या या विधानांवर ज्या विविध प्रतिक्रिया व्यक्त झाल्या त्या पाहता राजकारणात अशाप्रकारे केलेली गंमत कशी विचित्र ठरू शकते हे सिद्ध झाले.

### आरजी कार बलात्कार–हत्या प्रकरण, पीडितेच्या पालकांना सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा

नवी दिल्ली : कोलकाता येथील आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये ड्युटीवर असलेल्या महिला डॉक्टरवर बलात्कार करुन तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी सोमवारी (दि.१७) सर्वोच्च न्यायालयाने पीडितेच्या पालकांना कोलकाता उच्च न्यायालयात जाण्याची परवानगी दिली आहे. या प्रकरणाची नव्याने सीबीआय चौकशी करावी, अशी मागणी करणारी पीडितेच्या पालकांची याचिकाही सर्वोच्च न्यायालयाने निकाली काढली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले की अर्जदार (पीडितेचे पालक) कोलकाता उच्च न्यायालयात याचिका दाखल करू शकतात. पीडितेच्या पालकांसाठी वरिष्ठ वकील करुणा नंदी यांनी बाजू मांडली. भारताचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सीबीआयचे प्रतिनिधित्व केले.

# उसाची एफआरपी एकरकमी द्या!

## हायकोर्टाचे सरकारला आदेश; शासनाचा निर्णय रद्द केल्याने शेतकऱ्यांना दिलासा

मुंबई । प्रतिनिधी
राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी असून आता शेतकऱ्यांना एक रक्कमी एफआरपीची रक्कम देण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. शेतकऱ्यांना उसाची एफआरपी एक रक्कमीच द्या, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. राज्य शासनाचा यासंदर्भातला आदेश मुंबई उच्च न्यायालयाकडून रद्द करण्यात आला आहे.




ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी लढणारे स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने हे आदेश दिले आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस बिलाची एफआरपी टप्प्याटप्प्याने देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. मात्र, पान २ वर

### साखर कारखानदारांना चारी मुंड्या चीत केले – राजू शेट्टी

राज्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार असताना तुकड्या तुकड्याने एफआरपी देण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे एफआरपी देण्याच्या पद्धतीत जो बदल केला होता तो निर्णय आम्ही पूर्ववत करून सगळ्या साखर कारखानदारांना चारी मुंड्या चीत केलेले आहे, असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी हायकोर्टाच्या निर्णयानंतर म्हटले. कारखानदारांच्या दबावाला बळी पडून मविआ सरकारने तुकड्या तुकड्याने एफआरपी देण्याचा निर्णय त्यावेळी घेतला होता, असेही शेट्टी यांनी म्हटले. राज्य सरकारचा २१–२–२०२२ चा शासन निर्णय उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राजू शेट्टी माध्यमांशी बोलत होते.

# कृष्णा आंधळे नेमका लपला कुठे?

## तृप्ती देसाईंनी थेटच सांगितले; तृतीय पंथीयांसोबत कनेक्शन?





बीड । प्रतिनिधी
सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी मस्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली, यावेळी बोलताना त्यांनी कृष्णा आंधळेबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. आंधळे नेमका कुठे असू शकतो हेच देसाई यांनी सांगून टाकले असून आता पोलिसांसमोर त्याचा शोध घेण्याचे मोठे आव्हान आहे.

तृप्ती देसाई यांनी मस्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली, त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, मध्यंतरी मला एक फोन आला होता, कृष्णा आंधळे हा महाराष्ट्र आणि कर्नाटक बॉण्ड्री वर तृतीयपंथीयांच्या वेशात असू शकतो असे समोरच्या व्यक्तीने मला सांगितले. त्यांनी मला हेही सांगितले की बीड जिल्ह्यातल्या अनेक तृतीयपंथीयांसोबत त्याचे चांगले पान २ वर

### वाल्मिक कराडच्या मुक्कामाविषयी सुध्दा वक्तव्य

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, वाल्मीक कराड १५ आणि १६ डिसेंबरला दिंडोरीचं जे गुरुपीठ आहे अण्णासाहेब मोरे यांचे तिथे मुक्कामाला होता. त्याबरोबर विष्णू चाटे सुद्धा होता हे दोघेही तिथे राहिले आहेत, त्यांना व्हीआयपी वागणूक व्हीआयपी जेवण दिले गेले आहे. त्यांना माहीत होते. खंडणीतील आरोपी आहेत, हत्येतील आरोपी आहेत तरीसुद्धा मुद्दामून त्यांना तिथे ठेवले गेले असा आरोपीही त्यांनी यावेळी केला.

### वाल्मिक कराडच्या जवळचे ते २६ पोलिस अधिकारी कोण?

तृप्ती देसाईने वाल्मीक कराड याच्या जवळच्या असलेल्या २६ पोलिसांचे दिले पुरावे दिले. त्यासाठी त्यांनी बीडच्या अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी श्री. पांडकर यांना लेखी व पेन ड्राइव्हच्या माध्यमातून हे पुरावे दिले. त्यामुळे ते २६ पोलिस अधिकारी नेमके कोण? याविषयी सध्या जोरदार चर्चा सुरु आहे.

## थोडक्यात...

### औरंगजेबच्या कबरीवरुन नागपुरात जाळपोळ

नागपुर : औरंगजेबाच्या कबरीविरोधात राज्यात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत. आता या विषयावरुन नागपूरमध्ये सोमवारी दोन गटात हिंसक हाणामारी झाली. यावेळी जाळपोळ करण्यात आल्याने तणावाचे वातावरण आहे. नागपुरातील महाल परिसरात औरंगजेबाच्या कबरीवरून हे दोन्ही गट समोरासमोर आले. काही वेळातच दोन्ही गटांमध्ये दगडफेक सुरू झाली. दगडफेकीत पोलीस जखमी झाले आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या.

### प्रदूषण रोखण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करणार:पंकजा मुंडे

मुंबई–पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेत मोठी घोषणा केली आहे. प्रदूषण रोखण्यासाठी सरकार टास्क फोर्स स्थापन करणार असल्याचे पर्यावरण मंत्र्यांनी जाहीर केले आहे. तसेच पर्यावरण विभाग केवळ आता नोटीसा देणार नाही, असा इशाराही यावेळेस पंकजा मुंडे यांनी दिला.

### कॅबिनेटच्या बैठकीत औरंगजेबाच्या थडग्याचा मुद्दा अग्रस्थानी

मुंबई–राज्य कॅबिनेटच्या बैठकीत औरंगजेबाच्या थडग्याचा मुद्दा अग्रस्थानी असल्याचे दिसून आले. लोकभावनेने जर बाबरी पाडली जाऊ शकते तर औरंगजेबचे थडगं का हटवले जाऊ नये? असा प्रश्न काही मंत्र्यांनी कॅबिनेटमध्ये उपस्थित केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सर्व महायुतीचे नेते औरंगजेबाच्या मुद्द्यावर आक्रमक होणार असल्याचे समजत आहे. तसेच मंगळवारी सरकारमधील आमदार या मुद्द्यावर आक्रमक भूमिका मांडणार असल्याचे समजते.

### निधीसाठी सेनेचे मंत्री मुख्यमंत्र्यांना पत्र देणार

मुंबई–खात्याला निधी मिळाला नाही म्हणून शिवसेनेचे काही मंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देणार आहेत. शिवसेनेच्या काही मंत्र्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली होती. खात्याला निधी नसेल तर काम कसं करणार, असा सवाल त्यांनी केला होता. खात्याचा निधी वळवताना मंत्र्यांना विचारले देखील जात नसल्याची तक्रार त्यांनी केली.

### खोक्याचे पोलीस कोठडीत अन्नत्याग आंदोलन

बीडः सतीश ऊर्फ खोक्या भोसलेचे सोमवारपासून पोलीस कोठडीत अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. पोस्को, अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्याची मागणी केली जात आहे. घर जाळणाऱ्या आरोपींना अटक करून न्याय देण्याची मागणी त्याने केली आहे. न्याय मिळेपर्यंत सतीश ऊर्फ खोक्या भोसले अन्नत्याग आंदोलनावर ठाम आहे. वकील अंकुश कांबळे यांच्यामार्फत खोक्या भोसलेने शिरूर कासार पोलिसांना निवेदन दिले आहे. खोक्या भोसलेची २० मार्चला पोलीस कोठडी संपणार आहे.

### ८ व्या वेतन आयोगासाठी सरकारने मागविल्या सूचना

नवी दिल्लीः देशातील सुमारे १ कोटी केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी आनंदाची बातमी आहे. सरकारने ८ व्या केंद्रीय वेतन आयोगाची तयारी सुरू केली आहे. सरकार ८ व्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींवर (टीओआर) सूचना मागवत आहे. वित्त मंत्रालय, संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय, कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग आणि राज्य सरकारकडून इनपुट मागवले आहेत. ८ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे सुमारे ३६.५७ लाख सरकारी कर्मचाऱ्यांना (१ मार्च २०२५ पर्यंत) आणि ३३.९१ लाख निवृत्तीवेतनधारक/कौटुंबिक निवृत्ती वेतनधारकांना (३१ डिसेंबर २०२४ पर्यंत) थेट फायदा होईल. याशिवाय संरक्षण पान २ वर

# बायकोच्या गाडीत बंदुक ठेवणारा पुरुष नाही

## सुप्रिया सुळेंची धनंजय मुंडेवर जहरी टीका; पुढच्या ६ महिन्यात आणखी एक विकेट पडणार





पुणे । प्रतिनिधी
बायकोच्या गाडीत बंदूक ठेवणारा पुरुष नाही, अशा शब्दात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी माजी मंत्री आणि आमदार धनंजय मुंडेवर घणाघाती टीका केली आहे. तसेच पुढच्या ६ महिन्यांत आणखी एका मंत्र्याची विकेट जाणार, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या. त्यामुळे तो मंत्री नेमका कोण? याविषयी सर्वांना उत्सुकता आहे.

संतोष देशमुख खून प्रकरणानंतर तत्कालीन मंत्री धनंजय मुंडे यांना महायुतीसह विरोधकांना टार्गेट केले होते. त्यामुळे मुंडे यांना पदावरुन कधी पायउतार केले जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. शेवटी मुंडेंना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावाच लागला. त्यानंतर मुंडेवर सुप्रिया सुळे यांनी जहरी टिका केली असून दोन बायका असणाऱ्याने आणि आपल्या मुलांची पान २ वर

### आतापर्यंत सुप्रिया सुळे कुठे होत्या?–देसाई

ज्या वेळी धनंजय मुंडे यांनी करुणा मुंडेंच्या गाडीत दुसऱ्याकडून बंदुक ठेवली त्या वेळी ते शरद पवारांच्या पक्षात होते. त्यावेळी ते सुप्रिया सुळेंना दिसले नव्हते का?, त्यावेळी त्या गप्प का बसल्या? त्या त्यावेळी कुठे होत्या? असा सवाल तृप्ती देसाई यांनी केला.

### ..तर चार मंत्र्यांची विकेट पडेल–आ. पवार

राज्य सरकारमधील काही मंत्र्यांच्या बाबतीत आम्ही वेळोवेळी पुरावे दिले. आता इतर पुरावे दिले तर आणखी चार मंत्र्यांच्या विकेट पडतील, असा दावा आ. रोहित पवार यांनी केला आहे. त्यामुळे ते चार मंत्री नेमके कोण? याविषयी आता सर्वांना उत्सुकता आहे.

# धुलीवंदनादिवशी हवेत गोळीबार

## गावठी पिस्टलसह तिघे पकडले



पिंपळनेर । प्रतिनिधी
धुलीवंदनाच्या दिवशी शेतात पार्टी करताना हवेत गोळीबार करणाऱ्या एकासह तिघांना गावठी पिस्टलसह गजाआड केले आहे. या प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसापासून बीड जिल्हा हा कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत चर्चेत आहे. कधी खून, कधी बलात्कार, कधी अमानुष मारहाण तर कधी विनयभंग अशा घटना कमी होण्याचे नाव घेत नाहीत. धुलीवंदनाच्या दिवशी नाथापुर शिवारातील रवि राधेश्याम वक्ते याच्या शेतात पार्टी सुरु असताना अजय अण्णासाहेब साबळे याच्याकडील गावठी पिस्टलमधून महादेव सर्जेराव चव्हाण पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २०८.५० क्विंटल | २,२०० | २,९४१ | २,५८४ |
| ज्वारी/हायब्रिड: १४४.०० क्विंटल | १,९०० | ३,३१५ | २,३२४ |
| मका/लोकल:३५.०० क्विंटल | २,०९० | २,११० | २,१०० |
| तूर : २८.०० क्विंटल | ६,९०० | ६,९५० | ६,९३३ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ७९.०० क्विंटल | २,०५१ | ३,०७० | २,६७४ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: २८.५० क्विंटल | ३,८०१ | ४,०११ | ३,९३९ |
| हरभरा: ७०.०० क्विंटल | ३,९७५ | ५,००० | ४,८७७ |

## उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची विधिमंडळात घोषणा

# बीड जिल्ह्यात सुसज्ज विमानतळ उभारणार

### माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी अजित दादांसह राज्य शासनाचे मानले आभार

मुंबई । प्रतिनिधी
बीड जिल्ह्यात विमानतळ उभारून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधींनी केली असून याबाबतचा प्रस्ताव बीड जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणांना सादर केलेला आहे. बीड जिल्ह्यात सुसज्ज असे विमानतळ उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, या कामाला आता गती देण्यात येणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी आज विधिमंडळात घोषित केले.



बीड जिल्हा प्रशासनाने मागील काळात याबाबतचा प्रस्ताव केंद्र व राज्य शासनास संबंधित यंत्रणांकडे सादर केलेला असून, किमान तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारण्याच्या दृष्टीने सुसज्ज जागा, केंद्र व राज्य सरकारच्या पान २ वर


(प्रतिकात्मक)

### आ.विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश



बीड । प्रतिनिधी
आ.विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले असून उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून जिल्ह्यातील उद्योग वाढीला मोठा फायदा होणार आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नानांची ऑफर अन् राजकिय धुळवड

बुरा ना मानो होली है'च्या नावाखाली कोणत्याही प्रकारची चेष्टामस्करी करण्याचा परवाना दिला असला, तरी राजकारणात मुरलेल्या राजकीय नेत्यांनी होळीच्या निमित्ताने अशा प्रकारची चेष्टामस्करी करावी का, हा मात्र वादाचा विषय ठरू शकतो. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या एका विधानामुळे विनाकारणच खळबळ माजली आणि नंतर आपण गमतीने हे विधान केले असा खुलासा त्यांनी केला. त्यांच्या या विधानांवर ज्या विविध प्रतिक्रिया व्यक्त झाल्या त्या पाहता राजकारणात अशाप्रकारे केलेली गंमत कशी विचित्र ठरू शकते हे सिद्ध झाले.

सध्याच्या महायुतीच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री पदावर असलेले शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनी आमच्या सोबत यावे आम्ही त्यांना आळीपाळीने मुख्यमंत्री करू अशा प्रकारची ऑफर नाना पटोले यांनी दिली होती. सध्या महाविकास आघाडीमध्ये किंवा काँग्रेस पक्षामध्ये कोणत्याही महत्त्वाच्या पदावर नसलेल्या नाना पटोले यांना अशा प्रकारची ऑफर देण्याचा अधिकार आहे की नाही हा जरी वेगळा विषय असला तरी त्यांनी दिलेल्या या ऑफरनंतर ठाकरे शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी तातडीने प्रतिक्रिया देऊन नाना पटोले यांनी ही ऑफर जाहीर करून घाई केली असे म्हटले. एवढेच नाही तर खूप पूर्वीच एकनाथ शिंदे काँग्रेससोबत जाण्यास तयार होते आणि त्यांनी केंद्रातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अहमद पटेल यांची भेटही घेतली होती अशा प्रकारचे विधानही केले.

या विषयाची व्याप्ती वाढू लागल्यानंतर नाना पटोले यांनी सारवासारव करण्याच्या निमित्ताने आपण होळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर गंमत केली आणि ते विधान सीरियस नव्हते अशा प्रकारचा खुलासा केला. तरी या गमतीच्या निमित्ताने संजय राऊत यांनी जो दावा केला तो तर त्यांना मागे घेता येणार नाही. मुळात शिवसेना फोडून एकनाथ शिंदे भाजपबरोबर जाऊन मुख्यमंत्री झाले होते. साहजिकच एकनाथ शिंदे त्यावेळी खरोखरच काँग्रेससोबत जाण्यास तयार होते का आणि त्यांनी अहमद पटेल यांची भेट घेतली होती का हासुद्धा संशोधनाचा विषय ठरू शकतो. अर्थात, संजय राऊत आपल्या दररोजच्या पत्रकार परिषदेमध्ये कोणत्या ना कोणत्या विषयावर नेहमीच प्रतिक्रिया व्यक्त करत असतात. तशाच प्रकारची प्रतिक्रिया त्यांनी नाना पटोले यांच्या या ऑफरच्या विधानावरही दिली असावी.

काळाच्या ओघात त्या प्रतिक्रियाही मागे पडतात. नाना पटोले यांनी केलेल्या या विधानाची दखल काँग्रेसच्या नेत्यांनीही घेतली आणि अनेकांना ही गंमत आवडलेली नाही हे त्यांच्या देहबोलीवरूनही सिद्ध होते. मुळात नाना पटोले प्रदेशाध्यक्षपदावर असताना त्यांनी या प्रकारचे विधान केले असते, तर त्याला काही अर्थ प्राप्त झाला असता. पण इतर कोणत्याही नेत्यांना विश्वासात न घेता त्यांनी अशा प्रकारचे विधान केल्यामुळे नाराजी निर्माण होणे साहजिक आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे जरी ही ऑफर गंभीर होती असे मानले तरी महाविकास आघाडीचे इतर घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्याकडून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे स्वागत झाले असते का, हे कसे गृहीत धरता येईल? तरीही संजय राऊत यांनी आपल्या नेहमीच्या शैलीमध्ये या ऑफरवर प्रतिक्रिया व्यक्त करून जी मुळात गंमत होती ती गंमत अधिकच ताणण्याचा प्रयत्न केला.

अनेक वेळा आपल्या राजकीय नीतीचा भाग म्हणून राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते संभ्रमाचे वातावरण निर्माण करत असतात. यानिमित्ताने जी चर्चा निर्माण होते त्यामुळे काही काळ खळबळ माजते आणि संशयाचे वातावरण वाढू लागते. त्याचाच एक भाग म्हणून या सर्व राजकारणाच्या गमतीकडे पहावे लागणार आहे. एकनाथ शिंदे यांनी या गमतीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना काँग्रेस सोबत जाण्याचा प्रश्नच नाही असे म्हटले. अजित पवार यांनी मात्र याबाबत काहीही भूमिका घेतलेली नाही. कारण या प्रकारच्या गमतीकडे दुर्लक्ष करण्याचेच त्यांनी आजपर्यंत धोरण स्वीकारले आहे. एकीकडे राजकारणातील ही गंमत सुरू असतानाच दुसरीकडे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते जयंत पाटील यांनीसुद्धा अशाच प्रकारची गंमत सुरू केलेली दिसते. 'माझे आता मन लागत नाही. मला फारसे महत्त्वही नाही' अशा आशयाचे विधान त्यांनी पक्षाच्या व्यासपीठावरूनच केले आहे. एकीकडे जयंत पाटील लवकरच शरद पवारांची साथ सोडून अन्य कोणत्या पक्षामध्ये जातील अशा प्रकारची चर्चा सुरु असल्याच्या पार्श्वभूमीवर जयंत पाटील यांचे हे विधानही सूचक मानावे लागेल. अर्थात, अजूनतरी जयंत पाटील यांनी आपण गमतीने ते विधान केले असे म्हटलेले नाही आणि जयंत पाटील यांची नाराजीसुद्धा लपून राहिलेली नाही. सध्या सत्तेवर असलेली महायुती भक्कम असल्याने उर्वरित पाच वर्षे आपल्याला विरोधी बाकांवरच बसावयाचे आहे याची कल्पना असल्यानेच केवळ स्वप्नरंजन म्हणून अधूनमधून राजकारणात अशी गंमत केली जाते असे दिसते.

## जालन्यात प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन जाग्यावरच निवड-सहाय्यक आयुक्त चिमणकर

जालना । प्रतिनिधी

**नोकरीच्या शोधात असलेल्या जालना जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांच्याकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने तसेच रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. तरी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाकडून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना येथे बुधवार दि.१९ मार्च २०२५ रोजी ''प्लेसमेंट ड्राईव्ह -जागेवर निवड संधीचे आयोजन सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आले आहे, अशी माहिती कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी दिली आहे.**

म्हस्के टेक्नॉलॉजीज प्रा.लि.जालना यांचे आय.टी.आय कोणताही ट्रेड उत्तीर्ण करिता ऑपरेटरची २ पदे, आय.टी.आय इलेक्ट्रिशीयन उत्तीर्ण करिता ३ पदे तसेच भूमी कॉटेक्स प्रा.लिमिटेड जालना यांची पदवी उत्तीर्ण करिता सुपरवायझरची ३ पदे, तसेच लेखा विषयक अनुभव असलेल्या बी.कॉम उत्तीर्ण करिता लेखापाल करिता ३ पदे, कोणतीही पदवीधर उत्तीर्ण करिता वजन काटा ऑपरेटर साठी १ पद, आय.टी.आय उत्तीर्ण मशीन हेल्परसाठी ३ पदे, बी.एस्सी कृषी उत्तीर्णसाठी मार्केटिंग प्रतिनिधीसाठी ४ पदे तसेच दहावी उत्तीर्णकरिता डाटा एन्ट्री कार्यालयीन सहायक पदासाठी १ अशी एकुण २० रिक्तपदे प्राप्त झालेली आहेत. याकरीता नोकरी इच्छुक पात्रता धारक उपस्थित होणाऱ्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध आहे.

## विद्यार्थ्यांनी शिस्त प्रमाणे अभ्यासाशी प्रामाणिक केला पाहिजे -अप्पर पो अधीक्षक नोपाणी



जालना । प्रतिनिध

**महाविद्यालयीन जीवनात आपण ज्ञान संपादनासाठी प्रामाणिक राहिले पाहिजे. तसेच झोकून देऊन अभ्यास केला पाहिजे. कोणतेही काम आवड म्हणून केल्यास अधिक उत्तम होईल तसेच आपल्या कार्यावर आपला विश्वास असला पाहिजे, ज्ञानाचे, व्यवसायाचे कोणतेही क्षेत्र असू द्या त्यात आपल्याकडील उत्तम कौशल्याचा वापर केला पाहिजे, शिस्त जर नसेल तर आपण जीवनात यशस्वी होऊ शकणार नाही म्हणून आपल्या कामाशी आपण प्रामाणिक राहिले पाहिजे असे प्रतिपादन अप्पर पोलिस अधीक्षक श्री. आयुष नोपानी यांनी येथे बोलतांना केले. एका महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन पारितोषिक प्रसंगी ते बोलत होते.**

यावेळी म्हणुन व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी स्नेहसंमेलन साठी बहुसंख्येने उपस्थित राहिलेल्या विद्यार्थ्यांकडे बघून श्री. नोपाणी पुढे म्हणाले, तुमची उपस्थिती पाहून मला फार आनंद आणि समाधान वाटते. कारण अलीकडे महाविद्यालयात नियमित उपस्थित राहणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असून वर्गात बसून ज्ञान संपादन करण्यास आजची पिढी का घाबरत आहे हे समजत नाही. जो विद्यार्थी महाविद्यालयात नियमित येतो, वर्गात बसतो, शिक्षकांचे मन लावून ऐकतो आणि महाविद्यालयातील विविध उपक्र मात सहभागी होतो; असाच विद्यार्थी करियर तर करतोच पण आयुष्याच्या लढाईत सुद्धा विजयी होतो. निकोप प्रेम, मैत्री असावी याबद्दल ते म्हणाले, मैत्री प्रेम करणे हा काही गुन्हा नाही मात्र ती स्वच्छ आणि निकोप असावी. मैत्री मधून एकमेकांना ब्लॅकमेल करू नका दोघांसाठी ते घातक आहे. आपले जीवन अमूल्य असून त्याचा आनंदाने स्वीकार करा, मैत्रीमधील लक्ष्मण रेषा कधीही ओलांडू नका तसेच कोणतीही गोष्ट आपल्या पालकांपासून लपवू नका असा प्रेमळ सल्लाही श्री. नोपाणी यांनी यावेळी दिला.

## खोक्याचा तपास एसआयटीकडे द्या मागणीसाठी वन्यजीवप्रेमी व पर्यावरणवादीचे मुंबईत उपोषण

बीड । प्रतिनिधी

**सराईत गुन्हेगार सतिष भोसले उर्फ खोक्या रा. झापेवाडी ता. शिरूर (का) जि. बीड यांचेवरील सर्व गुन्ह्यांच्या तपासणीसाठी विशेष चौकशी पथक (एसआयटी) स्थापन करावी या मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदान येथे ओबीसी समाजाच्या वतीने दि.२०/०३/२००५ पासुन आमरण उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती दशरथ वणवे मोहन आघाव माउली सिरसाट यांनी शासकीय विश्रामगृहावर झालेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केले जिल्ह्यातील समस्त वन्यजीवप्रेमी व पर्यावरणवादी नागरिक यात सहभागी होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.**

शिरूर कासार येथील बावी गावातील दिलीप ढाकणे व महेश ढाकणे पितापुत्रांबर दि. १९/०३/२०२५ रोजी खोक्या ऊर्फ सतिष भोसले यांने व इतरांनी जिवघेणा हल्ला केला आहे. या हल्ल्याचे कारण हे केवळ ढाकणे पिता पुत्रांनी हरणांच्या शिकारीला केलेल्या विरोधामुळेच झाला आहे. या हल्यानंतर ढाकणे पिता पुत्रांनी गुन्हा दाखल करण्याचा तात्काळ प्रयत्न केला मात्र पोलीसांनी राजकीय दबावामुळे तो गुन्हा त्यावेळेस दाखल झाला नव्हता. पुढे खोक्या भोसलेचे गुन्हेगारी प्रकार उघडकीस आल्यानंतर हा गुन्हा पोलीसांनी दाखल केला आहे.खोक्या भोसले हा वन्यजीव जसे की, हरण, काळविट, मोर यांची हत्या करणारा असून या जिवांची हत्या केल्यानंतर वन्यजीय हे बाहेर देशात तस्करी केली जाते काय ? याची कसून चौकशी करणे आवश्यक आहे. खोक्या भोसले यांचे राहत्या घरातून वन अधिकाऱ्यांनी वन्यजीव मांरा, कातडे, शिकारीची जाळे आदि जप्त केले आहेत.सदर गंभीर घटनेनंतर खोक्यावर आणखी देखील गुन्हे दाखल झाले असून हा खोक्या महाराष्ट्रभरातील दरोडेखोरांकडून चोरीचे सोन्याची विल्हेवाट लावून तो त्याच्या राजकीय आका कडे पोहच करतो असा संशय आहे. खोक्या भौसलेने बीड जिल्ह्यात विविध जुगारवर आजतागायत वीस कोटी रूपयांची जुगाराची रक्कम हार-जीत केली आहे. त्याला राजकीय आशीवाद असल्याने अनेक गुन्हे दाबले गेले आष्टी मतदारसंघातील मयुर अभयारण्यातील हरिण, मोर व अन्य वन्यजीव मारले जातील अशी शक्यता नाकारता येत नाही,खोक्या भोसले ने महाराष्ट्रातील अनेक दरोडेखोरांकडून दरोड्यातील सोने है राजकीय पाठींबाच्या जोरांवर विल्हेवाट लावी असल्याचे तपासात पुढे येऊ शकते, कोट्यावधी रूपये उधळणे, हेलीकॉप्टर चा प्रवास, व दरोड्याच्या रक्कमेतुन गुंडगिरी या सर्व बाबींसह वन्यजीव हत्या या सर्व गुन्ह्यांचा तपास हा खोलवर जाऊन होणे आवश्यक आहे.याकरिता हा तपास आयपीएस अधिकाऱ्यांच्या समावेशासह विशेष तपास पथकाने सुपूर्द करावा या मागणीसाठी आम्ही दि.२०/०३/२०२५ गुरूवार पासुन आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण करणार आहोत असे पोलिसांना दिलेल्या निवेदनात मोहन आघाव ,माउली सिरसाट दशरथ वणवे रामदास बडे केशव तांदळे श्रीराम तांदळे सहदेव जायभाये धनराज गुट्टे बाळासाहेब सानप नवनाथ ढाकणे अशी मागणी केली आहे.

## मराठा आरक्षणासाठी मी कायम संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांच्या सोबत-शिवाजीराव पंडित

### मनोज जरांगे यांची शिवाजीराव पंडित यांनी घेतली भेट



गेवराई । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणासाठी लढणारे संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी भेट घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. मराठा आरक्षणाशिवाय मराठा समाजाचा उद्धार होऊ शकत नाही, मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी जो लढा उभारला तो योग्यच आहे. आपण आणि शिवछत्र परिवर मराठा आरक्षणासाठी आग्रही राहीलो. यापुढील काळात आपण मनोज जरांगे यांच्या सोबतच राहू असे प्रतिपादन माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी केले.**

माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांनी आज संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. आपण तब्येत सांभाळावी, मराठा समाजाला आपली गरज आहे. तुमच्या छायेखाली मराठा समाज एक झाला असून ही वज्रमूठ आता कोणीही रोखू शकत नाही. मराठा आरक्षणासाठी आपण कायम रस्त्यावर उतरलो. या वयातही आपण मराठा आरक्षण मिळवण्यासाठी संघर्ष केला. यापुढील काळात मराठा आरक्षणासाठी आपण कायम मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत आहोत असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी त्यांच्या सोबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संत विचार,संताचा मार्ग जीवनात अवलंबविला तरच जीवन कृतार्थ सफल होते-ह.भ.प.श्रीहरि चांगुणे महाराज

आष्टी । प्रतिनिधी

**पारमार्थिक जीवनात उन्नती करायची असेल तर जीवनात भक्ती,ज्ञान आणि वैराग्याची गरज आहे.भक्ती,ज्ञान,वैराग्याची व्याख्या सांगताना तुकाराम महाराजांनी स्पष्ट शब्दात सुत्रात्मक भक्ती म्हणजे नमन,वैराग्य म्हणजे त्याग आणि ज्ञान म्हणजे ब्रम्हीभोग याची परिणीती ब्रम्हतनू झाली पाहिजे.पारमार्थिक क्षेत्रात वाटचाल करताना एकतर वेदाच्या मागे गेले पाहिजे अथवा संताच्या मागे गेले पाहिजे तरच परमात्म स्वरुपाची प्राप्ती होते.मनाच्या मागे जाण्यात मानवाची अधोगती आहे.संत विचार, संताचा मार्ग जीवनात अवलंबविला तरच जीवन कृतार्थ सफल होते असे प्रतिपादन ह.भ.प.श्रीहरि चांगुणे महाराज यांनी केले.**



आष्टी शहरातील वसंतनगर येथील श्री जगतगुरु तुकाराम महाराज मंदीरात सुरु असलेल्या ३७५ वा.त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी संत तुकाराम महाराज बीज अखंड विठ्ठल नाम सप्ताह सोहळ्यात ह.भ.प. श्रीहरि महाराज चांगुणे बोलत होते. यावेळी ह.भ.प. श्रीहरि पुरी महाराज, सोनाजी बनकर, ह.भ.प. गोविंद पवार सर,अशोक डोके सर,संतोष बोरुडे सर,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,उध्दव विधाते,अशोक काकडे,किशोर महाराज,सोपान जोगदंड,सागर चौधरी,शिवाजी धोंडे,अमोल बळे,ह.भ.प.दादा महाराज चांगुणे, घनशाम खलासे, माजी सरपंच सौ.आदिकाताई लोखंडे,सौ. प्रतिभाताई जोगदंड, छानबाई पाटील, सौ.अनिताताई चौधरी,किसनराव रासकर, सचिन धोंडे,प्रा.सुभाष रासकर, नवनाथ डोके,बाळासाहेब रासकर,सोपान जोगदंड, नानासाहेब तवले,लालामहाराज राक्षे आदि मान्यवर उपस्थित होते.यावेळी ह.भ.प.चांगुणे महाराज म्हणाले की,खरी भक्ति कशाला म्हणतात. प्रत्येक जीवमात्रात भगवंत पाहणं ही दृष्टी येणं याला खरी भक्ती म्हणतात. वैराग्य म्हणजे त्याग.अहंकाराचा त्याग केला पाहिजे कारण अहंकार हा अधोगतीला घेऊन जातो. ज्ञानाला कारण श्रवण आहे. परमार्थ करणं म्हणजे देवाची प्राप्ती करणे नाही कारण देव प्राप्तच आहे.फक्त जीवनाताले अज्ञान गेले की जीव ब्रहरूप आहे याचे ज्ञान होते.परमार्थात भक्ति,ज्ञान आणि वैराग्य याची गरज असते.भक्ती केल्याशिवाय आणि साधु संतांची सेवा केल्यावाचून समाधान,सुख, शांती प्राप्त होत नाही.अमूल्य किंमतीचा हा नरदेह कोटी रुपये खर्च करूनसुद्धा पुन्हा प्राप्त होत नाही.जमीन,गेलेले धन हे पुन्हा मिळवता येते पण एकदा शरीर गेलं की पुन्हा शरीर मिळत नाही म्हणून या शरीराकडून भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे.अनंत जन्माच्या पुण्याईने हा देह आपल्याला प्राप्त होतो.काहींना नरदेह मिळाला नाही त्याचे महत्त्वही कळालेले नाही, काहींना नरदेह मिळाला त्याचं महत्त्वही कळालं. काहींना नरदेह मिळाला नाही परंतु त्याचे महत्त्व कळाले नाही.साधु संतांच्या सहवासामध्ये गेल्यानंतर या जीवाला मी कोण आहे ? मी कुठून आलोय? मला कोठे जायचे ? याची जाणीव संत करून देत असतात.संत सहवासाशिवाय खरे ज्ञान मिळत नाही.संत सहवासाने ब्रम्हज्ञान प्राप्त होते. ह.भ.प.चांगुणे महाराज पुढे म्हणाले की,परमार्थात आनंद हवा असेल तर गाथा,ज्ञानेश्वरीत रंगले पाहिजे. प्रयत्नाला प्रारब्दाची साथ असल्याशिवाय संसार होत नाही तसेच प्रयत्नाला कृपेच्या साथीशिवाय परमार्थ होत नाही.परमार्थ बळजबरीने होत नसतो.आत्मकृपा, शास्त्रकृपा,संतकृपा आणि देवकृपा या चार कृपा असतात. आत्मकृपेसाठी अगोदर माणसाच्या मनाच्या कृपेची गरज असते.मनाने कृपा केल्यावर परमार्थ समजेलच असे नाही.शास्त्राची कृपा संत वचनातुन होत असते. संतकृपेशिवाय परमार्थ करता येत नाही.भारतीय संस्कृती कृतृज्ञ आहे.परमार्थात कृतृज्ञ असावे लागते.गंगा स्वताःबरोबर इतरांचे पाहते.गंगा ही गटार, नाले,नद्या यांना आपल्यात सामावुन घेत असते.माणसाने कृतृघ्न असु नये कृतज्ञ असावे असे शेवाटी सांगितले.

## पान १ वरून...

### उसाची एफआरपी

आता न्यायालयाने शासनाचा हा निर्णय रद्द ठरवला आहे. हायकोर्टाच्या या निर्णयामुळे राज्यभरातील ऊस शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्रासदायक ठरणारा आणि कारखानदारांना दिलासा देणार निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयाविरुद्ध शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यासंदर्भातील याचिकेवर सोमवारी न्यायालायत सुनावणी झाली. न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाजुने निर्णय देत शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.

-----------

### कृष्णा आंधळे

संबंध होते. त्यामुळे निश्चितच तृतीयपंथीयांसोबत त्यांचा वेश धारण करून एखाद्या वस्तीमध्ये तो तिथे असू शकतो आणि ते आपण पोलिसांना सांगावं असा मला फोन आला होता. मात्र त्यामध्ये कितपत सत्य आहे की नाही यामुळे मी तातडीने त्या संदर्भात कोणाशी बोलले नव्हते, असे तृप्ती देसाई यांनी म्हटले आहे.

-------------

### धुलीवंदनादिवशी हवेत

याने हवेत गोळीबार केला. याबाबतची गुप्त माहिती पिंपळनेर पोलिसांना मिळाल्यावर अजय साबळे यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता गोळीबार केल्याचे कबुल केले. याप्रकरणी अजय साबळे (रा. सिदोड, ता. बीड), रवि वक्ते (रा. नाथापुर. ता. बीड), महादेव चव्हाण (रा. नाथापुर, ता. बीड) या तिघांना ५० हजार किमतीच्या गावठी पिस्टलसह ताब्यात घेऊन पोशि अविनाश सानप यांच्या फिर्यादीवरुन पिंपळनेर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सपोनि घुगे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि मुरकुटे, पोउपनि जगताप, पोह शिंदे, पोह ठोंबरे, वाघ, सानप यांनी केली.

-------------

### बायकोच्या गाडीत बंदुक

आई असलेल्या बायकोच्या गाडीत दुसऱ्याच्या माध्यमातून बंदुक ठेवली. अशा व्यक्ती पुरुष असू शकत नाही, अशी टिका करुन आपण अशा माणसासोबत कधीच काम करु शकत नसल्याचे सांगितले.

-------------

### ८ व्या वेतन आयोगासाठी

कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या पगार आणि भत्त्यांमध्येही वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, सरकारच्या शिफारशींनंतरच पगारवाढीची खरी रक्कम ठरवली जाणार आहे. पंतप्रधानांनी जानेवारी २०२५ मध्ये ८ व्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली.

-------------

### आ.विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

सक्रिय सहभाग नोंदवत विविध विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. अर्थमंत्री ना अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून बीड येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी कार्यवाही सुरू करत असल्याची घोषणा केली. यामुळे बीड येथे नवीन विमानतळ उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. बीड जिल्हाधिकारी यांनी याबाबतच प्रस्ताव पाठवला असून त्यावर भूसंपादन आणि इतर सोपस्कार व्हावे तसेच इतर बाबीवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे सांगून बीड येथे कमीत कमी तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारली जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला विकासाच्या टप्प्यात येता येणार आहे. पर्यटन आणि इतर व्यवसायाला चालना मिळेल असेही ते यावेळी म्हणाले. दरम्यान विजयसिंह पंडित यांनी विधानसभा सदस्य झाल्यानंतर आपल्या भागातील विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. जलसंधारण, कृषी याबरोबरच विमानतळ उभा करण्याची मागणी करून त्यांनी आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाची झलक दाखवली. आ. विजयसिंह पंडित यांनी बीडच्या विमानतळाचा प्रश्न निकाली काढल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

---------------

### माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी अजित दादांसह

माध्यमातून भूसंपादन इत्यादी प्रक्रिया गतीने पूर्ण करून, विमानतळ उभारणीचे काम वेगाने केले जाईल असेही अजित दादा पवार आपल्या भाषणात पुढे बोलताना म्हणाले. बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी या घोषणेचे स्वागत केले असून, बीड जिल्हावासियांचे रेल्वे पाठोपाठ आता सुसज्ज अशा विमानतळाचेही स्वप्न पूर्ण होणार असल्याचा आपल्याला मनापासून आनंद आहे. हा निर्णय म्हणजे केवळ बीड साठीच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यासाठी मोठी उपलब्धी असून, बीड जिल्ह्याच्या औद्योगिक, कृषी आणि व्यावसायिक प्रगतीसाठी हा महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरणार आहे, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना याबाबतचा मूळ प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने केंद्र व राज्य सरकारकडे पाठवला होता. बीड जिल्ह्याच्या रेल्वे पाठोपाठ आता विमानतळाचे ही स्वप्न पूर्ण होणार असून गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आपल्या अर्थसंकल्पावरील भाषणात देखील विमानतळ उभारण्याची मागणी केली होती. विजयसिंह पंडित यांच्यासह ही मागणी वेळोवेळी केलेल्या सर्वच लोकप्रतिनिधींचे हे यश मानावे लागेल असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. १८ मार्च २०२५



## अण्णासाहेब पाटील महामंडळाने दिले ४२४८ उद्योजकांना ३२३ कोटीचे आर्थिक पाठबळ – जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर

बीड । प्रतिनिधी

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य अभियान योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात ४२४८ तरुणांना ३२३ कोटी २१लाख चे कर्जवाटप झाले आहे. तसेच या नवउद्योजकांना २८ कोटी ५२ लाख रुपयेचा व्याज परतावा त्यांच्या खात्यावर जमा झाला आहे. नियमित हप्ता भरणाऱ्यांना महामंडळाकडून व्याज परतावा दिला जातो, अशी माहिती अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर यांनी दिली.

महामंडळाकडून १०६११ तरुणांना पात्रता प्रमाणपत्र मिळाले आहे. शासनाने आर्थिक दुर्बल घटकातील युवकांना स्वयंरोजगारासाठी महामंडळाच्या माध्यमातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना आणि गट कर्ज व्याज परतावा योजना राबवल्या जातात. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून कर्ज योजनेमार्फत उद्योग व्यवसाय उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अर्थसहाय्यामुळे बीड जिल्हयात महामंडळाच्या माध्यमातून तरुणांना स्वप्नांना साकार करण्याचे नवे बळ मिळाले आहे.

नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्यांनाही नियमित व्याज परतावा येत आहे. तरुणांनी योजनेचा लाभ घ्यावा काही अडचणी असल्यास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क करावा,असे आवाहन महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर यांनी केले आहे.

## गुन्हेगारीच्या क्षेत्रांत युवकांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव

**नागनाथ वारद । अंबाजोगाई**



शहर व परिसरात गुन्हेगारीच्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात युवकांचा शिरकाव होत आहे वाढती बेरोजगारी याला कारणीभूत आहे परिणाम स्वरुप चोरी, दरोडे, मारामारी,खुन,फुस लावुन पळविणे यासारख्या घटना आता नेहमीच्याच झाल्या अस दिसुन येत आहे

गुंडांनी साम्राज्य प्रस्थापित केल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याने कायदा व सुव्यवस्था चक्क धोक्यात आलेली आहे पोलीस यंत्रणा पाहीजे त्या संख्येत नसल्याने केव्हाही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी परिस्थिती आहे मागील काही महिन्याच्या घटनेचे अवलोकन केल्यास आपोआपच परिस्थिती लक्षात येते शहर व परिसरात सातत्याने गुन्हे व हाणामारीच्या घटना घडत आहेत अवैध धंदे ही बेफाम चालूआहेत सर्वसामान्य लोकांचे जगणे कठिण झाल्याचे बोलल्या जात आहे किरकोळ घटना तर सारख्याच घडत असून गुन्हेनोंद पाहिल्यास तरुणांचा सहभाग दिसुन येत असल्याचे दिसत आहे कारणही पैसा आहे. विनाकष्ट तो मिळत असल्याने गुन्हेगाराचे मनोधैर्य वाढले आहे. त्यामुळेच संस्कृती जोपासणाऱ्या शहराला गालबोट लागत आहे त्यांना स्वत : चा परिवार, गुरूजन मोठ्याचा सन्मान या गोष्टी धुळीस मिळाल्याने मोठे संकट पार्श्वभूमीवर काही चोरट्या वाळु माफीया विविध राजकीय स्थानिक राज्यकत्यांचे

काही गावगुंड आता पावरफुल बनले गंभीर गुन्ह्याचे डिटेक्शन कमी मागील दोन वर्षाचे अवलोकन केल्यास दाखल झालेल्या गुन्ह्यातील प्रकणामध्ये बहुतांशी प्रकरणात पोलिसांनी आपल्या सोयीनुसार तपास केल्याचे जाणवते यंत्रणेचे काम अतिशय खालवले असण्याची शक्यता आहे कारण सध्या तरी पोलीस आपल्या सोयी नुसार काम करतांना दिसुन येतात व वरिष्ठ दर्जाचे पोलिस अधिकारी कधी तरी अंबाजोगाई पोलिस स्टेशनला भेट देतात काय शेरा लिहतात ही बाब गोपनिय असली तरीसमर्थक असल्याचा आव वरिष्ठ पोलिस अधिकारी व इथल्य लोकांना सांगतात आहे ही वस्तुस्थिती जनतेशी ते कायदा व सुव्यवस्था विषयी चर्चा ही करित नाही सण उत्सव इद च्या पार्श्वभूमीवर शांतता बैठकीच नियोजन करण्यात येत असले तरी त्या बैठकीत फारशी अशी चर्चा होतांना दिसुन येत नाही आता तर शांतता बैठकीला स्थानिक पत्रकरांना बोलविण्याचे टाळत असल्याच दिसुन येत आहे दैनिकाच्या स्थानिक पत्रकाराना तर इथल्या पोलिस स्टेशनला वावड असल्यासारख पोलिस वागत असतांना दिसुन येतात पोलिस स्टेशन त्यांच्या वर्षभरातील कामकाजचा आढवा घेतला तर विशेष अशी कोणतेही ठोस अशी कामगिरी दिसुन येत नाही.

## स्कुटी व अज्ञात वाहनाच्या धडकेत स्कुटीवरील दोघांचा अपघाती मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी





शहरापासून जवळच असलेल्या माजलगाव-गढी या राष्ट्रीय महामार्गवरील साबळे पेट्रोल पंपासमोर डॉ.शरद चव्हाण,यांच्या स्कुटीला अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत त्यांचा व त्यांच्या सोबत असलेले फार्मसिस्ट स्वरूप मस्के या दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि १६ मार्च रविवार रोजी मध्यरात्री १:०० ते १:३० वाजण्याच्या सुमारास घडली.

शहरातील बायपास रोडवरील मस्के हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेले डॉ.शरद नवनाथ चव्हाण रा. जायकोवाडी तांडा व त्याच्या सोबत स्वरूप मस्के हे राष्ट्रीय महामार्गावरुन माजलगाव शहराकडे येत असताना साबळे पेट्रोल पंपा समोर त्यांच्या स्कुटीला अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत गंभीर अपघात होऊन स्कुटीवरील दोघांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक दुर्दैवी घटना दि १६ मार्च रविवार रोजी मध्यरात्री १:०० ते १:३० वाजण्याच्या सुमारास घडली. मागील पाच वर्षांपूर्वीच शरद चव्हाण यांचे लग्न झालेले असून त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनानंतर मृतदेह दोघांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.याप्रकरणी माजलगाव शहर पोलिसात अज्ञात वाहना विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रेल्वे प्रश्नासाठी कळंबकर सरसावले, बैठकीस उत्तम प्रतिसाद

कळंब । प्रतिनिधी



केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयाने उस्मानाबाद व्हाया बीड औरंगाबाद रेल्वे मार्गासाठी अर्थसंकल्पात आठ कोटीची तरतूद केली आहे यामुळे धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुका ही रेल्वेच्या नकाशावर येणार आहे याबद्दल कळंब येथील नागरिकांनी आनंद व्यक्त करून शासनाचे आभार व्यक्त केले. या प्रश्नासाठी रविवार दि १६ मार्च रोजी येथील पंडित जवाहरलाल नेहरू उद्यान परिसरातील ज्येष्ठा साठीचा विरंगुळा येथे रेल्वे सर्वेक्षण आणि रेल्वे स्थानक संदर्भात डॉ रामकृष्ण लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत केंद्र शासनाच्या रेल्वे

बैठकीत सर्वेक्षण करताना रेल्वे मार्ग कळंब जवळून निश्चित करावा, त्या मार्गावर कळंब रेल्वे स्थानक करावे, रेल्वे सर्वेक्षण संदर्भातील शासकीय दस्तऐवज उपलब्ध करून त्याचा सखोल अभ्यास करणे, रेल्वे चे संबंधित अधिकारी, खासदार, आमदार, यांना भेटून आपल्या मागण्या लावुन धरणे, इ विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. बैठकीसाठी कळंब शहरातील सर्व स्तरातील व्यापारी, डॉक्टर ,वकील ,राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती बैठकीमध्ये डॉ. संजय कांबळे, सी.आर. घाडगे, मुसादेक काझी, सतपाल बनसोडे, सुरेश टेकाळे, डॉ, महाकुंडे,यशवंत हौसलमल, सचिन गायकवाड, प्रा. मोहन जाधव, संजय घोगरे, किशोर वाघमारे, ॲड,एस.एम.जाधवर , कमलाकर पाटील,प्रभाकर ढवण, रमेश जगताप,ॲड,अजित गवळी, यांनी आपले विचार व्यक्त केले बैठकीचे अध्यक्ष डॉ. रामकृष्ण लोंढे यांनी या प्रश्नासाठी कार्यकारणी गठन करण्यासाठी तसेच पुढील दिशा ठरवण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगितले,प्रास्ताविक व सूत्रसंचलन माधवसिंग राजपूत यांनी केले तर आभार ॲड,मनोज चोंदे यांनी मानले.

## पांडुरंग परमात्मा उदार अंतकरानाचा आहे-ह.भ.प तुकाराम महाराज करडकर

**बीड प्रतिनिधी**

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या बीज उत्सवानिमित्त खर्डेवाडी येथे श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा व त्रिदिवसीय कीर्तन महोत्सवातील तिसऱ्या दिवशीच्या किर्तन सेवेचे पुष्प गुंफताना करडकर महाराजांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा मागणी पर प्रकरणातील पुढील अभंग चिंतनास घेतला होता



**हेचि दान देगा देवा**
**तुझा विसर न व्हावा**

अभंगावर भाष्य करताना महाराज म्हणाले की भगवंत हा उदार अंतकरणाचा आहे आपल्याला झेपेल मावेल एवढे दान तो देतो परंतु आपण आपल्या जीवनामध्ये सदवर्तन ठेवा ,भगवंताचे चिंतन करा, जगात भगवंताच्या भगवत भक्ती शिवाय दुसरे विचार मनात आणू नका या भगवंत भक्तीचे फळ म्हणून भगवंत आपल्या सर्व मनोकामना पूर्ण करतात पंढरपुरातील श्री रुक्मिणीवर पांडुरंग परमात्मा हा उदार अंतकरणाचा आहे असे अनमोल विचार आपल्या चिंतन रुपी सेवेमध्ये तुकाराम महाराज करडकर यांनी विशद केले.

भक्ती करण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत परंतु सर्वश्रेष्ठ भक्ती म्हणजे श्रवण भक्ती होय असेही महाराजांनी सांगितले . आपल्या जीवनात इतर भक्ती करण्याच्या साधनेमध्ये आपणास काही अडथळे येऊ शकतात परंतु सर्वात सोपी भक्ती म्हणजे श्रवण भक्ती होय .आपण होईल तेवढे भगवंताचे नामस्मरण करा आणि आपल्या परिसरातील गावातील नाम सप्ताह ,किर्तन महोत्सव, भागवत ग्रंथ महापुराण आदी ठिकाणी आपली हजेरी लावून श्रवण भक्ती करा याचे फळ आपल्याला भगवंत दिल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास देखील तुकाराम महाराज करडकर आळंदी देवाची यांनी विशद केले. किर्तन सेवेनंतर कळेकर परिवाराच्यावतीने विनोद कळेकर यांनी महाराज मंडळी यांचा सन्मान करण्यात आला.या बीज उत्सवानिमित्त त्रि दिवशी कीर्तन महोत्सवाच्या सांगता प्रसंगी खरडेवाडी , धावज्याचीवाडी, पांढरवाडी, चाकरवाडी, आगेवाडी, परळी, बीड, वांगी आधी ठिकाणाहून महाराज मंडळी व गायक मंडळी उपस्थित होते.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत भैरवनाथ अध्यापक विद्यालयाने शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा राखला -प्राचार्या डॉ. भगिरथी गिरी

**कळंब । प्रतिनिधी**



**कळंब – २०१२ पासून अध्यापक विद्यालयांच्या प्रवेशाला व इतर शैक्षणिक बाबींना ओहोटी लागली होती.मात्र त्या कठीण परिस्थितीतही प्रवेश सुनिश्चित करून भैरवनाथ अध्यापक विद्यालयाने शिक्षक प्रशिक्षण क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली,असे प्रतिपादन मुरुड डाएटच्या प्राचार्या तथा अध्यापक विद्यालय तपासणी समितीच्या प्रमुख डॉ.भगिरथी गिरी यांनी केले.त्या शिक्षक क्षमता वृद्धी सेवांतर्गत प्रशिक्षण समारोप व भैरवनाथ अध्यापक विद्यालय तपासणी प्रसंगी मार्गदर्शन करताना बोलत होत्या.**

यावेळी भैरवनाथ अध्यापक विद्यालयात क्षमता वृद्धी सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या तिसऱ्या टप्प्याचा समारोप त्यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील होते. व्यासपीठावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुडचे ज्येष्ठ अधिव्याख्याता जयपाल कांबळे, अधिव्याख्याता घनश्याम पौळ, तंत्रज्ञ श्री.लांडगे,शिक्षक संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे,शिक्षण विस्तार अधिकारी संभाजी जगदाळे,भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सतीश मातने,प्रशांत घुटे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ.भगिरथी गिरी यांनी भैरवनाथ अध्यापक विद्यालयाच्या सेवाभावी योगदानाचे कौतुक करताना सांगितले की, ''शिक्षण प्रक्रियेत राज्याच्या शिक्षण सचिवापासून ते विद्यार्थ्यापर्यंत प्रत्येक घटक हा महत्त्वाचा आणि जबाबदार असतो.भविष्यात अध्यापक विद्यालय प्रवेशासाठी मोठी स्पर्धा निर्माण होणार आहे. त्यामुळे भैरवनाथ अध्यापक विद्यालयाने गुणवत्ता टिकवावी आणि आणखी उंची गाठावी.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सतीश मातने यांनी करताना २००७ पासूनच्या विद्यालयाच्या प्रवासाचा आढावा घेतला तसेच विविध क्षेत्रात चमकलेले माजी विद्यार्थी यांचा नामोल्लेख केला. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अविनाश घोडके यांनी केले,तर आभार मराठी विभाग प्रमुख प्रा.श्रीकांत पवार यांनी मानले.या कार्यक्रमास वेद शैक्षणिक संकुलातील कर्मचारी व प्रशिक्षणार्थी शिक्षकांची लक्षणीय उपस्थिती होती.

## साने गुरुजी कथामाला मुलांवर शाश्वत मूल्यांचे संस्कार करणारी चळवळ आहे -डी.के.देशमुख

माजलगाव । प्रतिनिधी



बीड येथे अ.भा.साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती बीडच्या वतीने अ.भा.साने गुरुजी कथामाला मध्यवर्ती मुंबईच्या वतीने घेण्यात आलेल्या श्यामची आई संस्कार परीक्षा घेतलेल्या माजलगाव तालुक्यातील शाळांना गौरव प्रमाणपत्र देण्यात आले.

या प्रमाणपत्राचे वितरण माजी शिक्षक आमदार तथा अ.भा.साने गुरुजी कथामाला मध्यवर्तीचे सल्लागार डी.के.देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच याप्रसंगी गाजरे यांना अ. भा.सानेगुरुजी कथामाला मुंबईच्या वतीने अतिशय प्रतिष्ठेचा मानला जाणारा सानेगुरुजी बालसेवा पुरस्कार-२०२५ जाहीर झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार डी.के. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनात कथामाला ही मुलांवर शाश्वत मूल्यांचे संस्कार करणारी चळवळ असून मागील ७५ वर्षांपासून काहीही न मागता,न घेता अखंडीतपणे माणूसकीची,व खर्या धर्माची शिकवण देणारी संस्था आहे असे सांगितले. प्रत्येक शिक्षकाने सानेगुरुजींचा आदर्श समोर ठेवून काम करावे असेही सांगितले. तालुक्यातील ३५ शाळांना हे प्रमाणपत्र देण्यात आले.सोबतच मध्यवर्तीच्या वार्षिक अहवालाची प्रत देण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात पू.साने गुरुजींच्या प्रतिमा पूजन व प्रार्थनेने केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कथामालेचे स्विकृत सदस्य बालाप्रसाद चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक,कथामालेचा व परीक्षेचा अहवाल कोषाध्यक्ष के.व्ही.गाजरे यांनी सांगितला.या वर्षी बीड जिल्ह्यातील १८५ शाळांमधून ११,६५० विद्यार्थ्यांनी संस्कार परीक्षा दिली. नंदकुमार कुलकर्णी व श्रीमती अर्चना भाले यांनी परीक्षा संदर्भात मनोगत व्यक्त केले. सदरील कार्यक्रमासाठी तालुक्यातील ३५ शाळांमधील शिक्षक,शिक्षिका मुख्याध्यापक उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी नवविकास मंडळ शिक्षण संस्थेचे संचालक शिरीष देशमुख,स्थानिक कथामालेचे अध्यक्ष गणेशराव मुळाटे, शिवणकर,किरण देशमुख उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार जिल्हा समितीचे सदस्य रामराव लांडगे यांनी मानले.

## संजीवनी जाधव, डॉ.प्रियांका डाके मिसेस माजलगावच्या मानकरी

**माजलगाव । प्रतिनिधी**



**येथील रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुलच्या वतीने दि १६ मार्च रविवार रोजी मिसेस माजलगाव या अनोख्या उपक्रमाच्या माध्यमातून स्पर्धचे आयोजन इगलवूड स्कूल फुले पिंपळगाव येथे करण्यात आले होते.सदरील कार्यक्रमात प्रथम क्रमांक सौ संजीवनी जाधव तर द्वितीय क्रमांक डॉ सौ.प्रियांका डाके यांनी मिळवला तर तृतीय क्रमांक सौ शितल मालानी यांनी मिळवला आणि सौ शुभांगी आनंदगावकर यांनी चौथ्या स्थानावर येण्याचा मान मिळवला.**

या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.माजलगाव शहर व परिसरातील महिलांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बक्षिसे जिंकली. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे अध्यक्ष तथा मंगलनाथ मल्टीस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक अॅड रवींद्र कानडे प्रकल्प प्रमुख डॉ अर्चना पवार व सर्व रोटरियन अशोक बजाज,लक्ष्मीनारायण मुंदडा,शशी किरण गडम,सुरेश भानप,पंडित तिडके,डॉ स्वानंद कुलकर्णी,जगदीश साखरे,गवारे, दिगंबर महाजन,डॉ सौ अंजली अकोलकर,डॉ.सौ अर्चना मोरे,सौ स्मिता लिमगावकर, शोभा वर्मा,सौ सोळंके उपस्थित होते.त्याचप्रमाणे इनरव्हील क्लब ऑफ माजलगावच्या अध्यक्ष सौ प्राजक्ता गुंडेवार,सेक्रेटरी सौ स्मिता कानडे व इनरव्हील क्लबच्या सर्व मेंबर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. जान्हवी वाघ आणि कु.प्रांजल देशमुख या विद्यार्थीनिंनी केले.मिसेस माजलगाव या सौंदर्य स्पर्धेचे सूत्रसंचालन सौ प्रणिता मॅडम यांनी केले व आभार प्रदर्शन सत्यजित सरांनी केले.सदरील कार्यक्रमा करिता माजलगाव शहर व परिसरातील शेकडोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे सर्व सदस्य , ईगलवूड इंग्लिश स्कूल व श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### व्याजाच्या पैशांसाठी तरूणाचे

लोखंडी रॉड, केबल वायर आणि फायबर पाईपने ओंकारला बेदम मारहाण केली. तसेच, ''व्याजाचे पैसे भर नाहीतर तुला फासावर लटकवू'' अशी धमकी दिली. यावेळी, एका स्थानिक व्यक्तीने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यालाही धमकावले.ओंकारच्या मित्राने घटनेची माहिती अजिंक्य कदम,गोविंद हाके, आदेश पटाईत यांना दिली. त्यांनी घटनास्थळी जाऊन आरोपींना समजावून सांगत ओंकारला सोडवले. मात्र नंतर भगवानबाबा चौकात पुन्हा आरोपींनी ओंकार व त्याच्या भावाला, ''जर पोलिसात तक्रार दिली तर जिवे मारू व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करू'' अशी धमकी दिली. सदर फिर्यादीवरून अनिकेत औताडे, जयपाल औताडे, धीरज बनसोडे, नूर, बापू इंगळे, अभिमन्यू औताडे व सिद्दीक या सात जणांविरोधात अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.

### गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे

तालुका प्रतिनिधी शिवशंकर भंडारे,केंद्र प्रतिनिधी दिगंबर सोळंके,अमोल सोळंके,रामराजे रांजवण,लक्ष्मण चुंबळे,सदाशिव ढगे,काशिनाथ काटकर,गजु चौधरी,डॉ अशोक घुबडे,डॉ शशिल पाचपोर,लक्ष्मण सोळंके,विशाल देवकते,शरद रुचके, रामप्रसाद गोळेकर, गजानन गोळेकर, गोरख मेंडके आदींनी केले आहे.

### विकास बनसोडे याच्या

त्याच्या शरीरावर मोजता येणार नाहीत एवढे वळ आहेत.त्यामुळे विकास बनसोडे यास मारणा-या आरोपींना तात्काळ अटक करून शासनाने कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे यांनी केली आहे.

### विकास बनसोडे हत्या

गुन्हे दाखल करण्यात आले. परंतू त्यापैकी फक्त सहा आरोपी अटक आहेत. उर्वरित आरोपींना तातडीने अटक करावी.बीड जिल्ह्याची एकंदरीत कायदा सुव्यवस्था लक्षात घेता,

या प्रकरणात मयत विकास बनसोडे याच्या नातेवाईकांनी प्रकरण लावून धरल्याने मयताचे पोस्ट मार्टम छत्रपती संभाजी नगर येथे इन कॅमेरा झाले आहे. विकास बनसोडे यास अमानुषपणे मारहाण करुन त्याची हत्या करण्यात आली आहे. हा सर्व प्रकार सुनियोजित कट आहे.त्यामुळे आरोपींना फाशी देण्यात यावी. विकास बनसोडे हत्या प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावे.अशी मागणी रिपाइंच्यावतीने करण्यात येत आहे. येत्या सहा दिवसात उर्वरित आरोपी अटक न केल्यास राज्यभर रिपाइंकडून तीव्र आंदोलन केले जाईल.असा इशारा निवेदनात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह रिपाइंचे राजू जोगदंड, किसन तांगडे, बापू पवार, अविनाश जोगदंड, भैय्यासाहेब मस्के, धम्मा पारवेकर, भिमराव घोडेराव, विष्णू जोगदंड, समाधान जाधव यांनी दिला.

### भावसार समाजाच्या

नोंदवला. शिबिराच्या सुरुवातीला बीड जिल्हा भावसार समाजाचे अध्यक्ष प्रकाश कानगावकर यांच्या हस्ते हिंगलाज मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बीड भावसार समाजाचे अध्यक्ष कैलास रंगदळ व सचिव सचिन डेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंद्रकांतराव धारुळकर, ओंकार गरुड, सुनिल फटाले, नामदेव उपरे, भावसार, विनायक बुरांडे, राम बोंबले, गणेश मुळे व सर्व समाज बांधवांनी परिश्रम घेतले. या शिबिरा अंतर्गत करण्यात येणाऱ्या चाचण्यांचे अहवाल दिनांक २३ मार्च रोजी बीड शहरातील तज्ञ डॉक्टर यांचे उपस्थितीत मार्गदर्शन घेऊन समाज बांधवास सुपूर्द केला जाईल.


### जीवनात पुढे जाण्यासाठी

दगडावरील पांढरी रेष आहे कठोर परिश्रम विनम्रता आणि मोबाईल पासून दूर राहणे ह्या गोष्टी घेतल्यातर यश आपल्या जवळच आहे असे सांगून त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या अंबाजोगाईच्या योगेश्वरी शिक्षण संस्थेत आपले विद्यालयीन, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले त्याबरोबरच अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनाच्या सरळ सेवेच्या भरतीप्रमाणे मराठवाड्यातच धाराशिव येथे जलसंधारण अधिकारी वर्ग दोन पदी आपली निवड झाली आणि मी माझी आई श्रीमती सुरेखा जोशी हिचे स्वप्न पुर्ण केले आपण लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली असल्याचे मानसी जोशी यांनी सांगितले.

यावेळी पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत मानसी जोशी यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी प्रतीक्षा जोशी,रोहिणी जड,कल्याणी कुलकर्णी,अनिता औटी, वर्षा मिरगे,प्रणिता पोखरीकर,प्रणिता सेलमोकर,सुरेखा जोशी,उज्वला गोस्वामी अविनाश जोशी,रमेश कुलकर्णी,पत्रकार प्रशांत बर्दापूरकर, राहूल देशपांडे,डॉ.महेश अकोलकर,पदमाकर सेलमोकर,दुर्गादास दामोशन,डॉ.प्रविण जोशी,विनायक गोस्वामी,संकेत तोरंबेकर,किरण गोस्वामी,केदार दामोशन,शिशिर हिरळकर,सराफ आदी उपस्थित होते.

cmyk

# कोंबड्यांतील पटकी आजार : लक्षणे, कारणे, उपचार



काहीवेळा कोणतीही लक्षणे न दाखवता कोंबड्यामध्ये अचानक मरतूक होते. तर खूप कमी कोंबड्यांमध्ये हिरवट अतीसार, विस्कटलेले पंख, जलद श्वसन अशी लक्षणे दिसतात. अशावेळी कोंबड्यांना फाउल कॉलरा म्हणजेच पटकी हा संसर्गजन्य रोग झाला असण्याची शक्यता असते. या रोगामुळे कोंबड्यांची मोठ्या प्रमाणात मरतूक होते. काही वेळा रोगाची कोणतीच लक्षणे दिसत नाहीत.पटकी हा रोग कोंबड्यांमध्ये जिवाणूद्वारे पसरणारा संसर्गजन्य रोग आहे. जिवाणूचा संसर्ग झाल्यानंतर बाधित कोंबडीमध्ये रक्तदोष म्हणजेच सेप्टीसेमिया होऊन कोंबड्या मरतात. ब्रॉयलर आणि लेअर अशा दोन्ही कोंबड्यांना फाउल कॉलरा रोग होतो. कमी वयाच्या कोंबड्यांपेक्षा जास्त वयाच्या कोंबड्यांमध्ये या रोगाची तीव्रता जास्त असते.

आजाराची कारणे आणि प्रसार :आपल्या भागात फाउल कॉलरा रोगाचा प्रादुर्भाव थंड आणि दमट वातावरणात होते. उन्हाळ्याच्या शेवटी, पावसाळा आणि हिवाळ्यात हा आजार दिसतो. फाउल कॉलरा बाधित कोंबड्यांची लाळ, शेंबूड, आणि अश्रू पासून हा रोग एका कोंबडीपासून इतर कोंबड्यांमध्ये लगेच पसरतो. याशिवाय उंदीर, घुशी, वराह, श्वान आणि मांजरांपासून या रोगाचा प्रसार होतो. या रोगाचे जिवाणू शेडमधील भिंती आणि जमिनीवर असलेल्या भेगा, खाद्य, पिशव्या, चप्पल, आणि इतर वापराच्या उपकरणांमध्ये जास्त काळ तग धरून राहतात. आजाराचा प्रसार सहसा अंड्यातून होत नाही.

आजाराची लक्षणे :फाउल कॉलरा या रोगाच्या जिवाणूचा संसर्ग झाल्यानंतर पाच ते आठ दिवसात काही कोंबड्यांमध्ये लक्षणे दिसतात. तिव्र प्रकारात बाधित कोंबडी कोणतीही लक्षणे न दाखविता सहा ते बारा तासांत दगावते. आणि कोंबड्यांतील मरतुकीचे प्रमाण वाढत जाते. फार कमी कोंबड्या आजाराची लक्षणे दाखवितात. यामध्ये सुरवातीला हिरवट रंगाचा अतिसार दिसून येतो. नैराश्य, विस्कटलेले पंख, फुफ्फुस दाह, आणि जलद श्वसन यासारखी ही लक्षणे दिसतात. तर सौम्य प्रकारात कोंबडीच्या शरीरावर सूज येते. डोळ्यांच्या त्वचेचा आणि कंठाचा दाह होतो. डोळ्यांतून अश्रू गळतात. डोळे, तुरे आणि कल्ले सुजतात. ते निळसर काळे पडतात आणि बाधित कोंबड्या लंगडतात.

असे करा उपचार :शेड स्वच्छ आणि हवेशीर ठेवावे. शेड आणि परिसरात पक्षी, उंदीर, घुशी, वराह, श्वान आणि मांजरांना येऊ देऊ नये. कोंबड्या शेडमध्ये ठेवण्यापूर्वी शेडचे निर्जंतुकीकरण करून घ्यावे. खाद्य,पाण्याची भांडी आणि इतर साहित्य दररोज स्वच्छ करुन उन्हात वाळवून घ्यावे. शेडमध्ये खाद्य आणि पाण्याची साठवणूक करू नये. कोंबड्यांनादूषित खाद्य आणि पाणी देऊ नये. सगळ्यात महत्वाच म्हणजे वयाच्या १० ते १२ आणि २१ व्या आठवड्यांत कोंबड्यांचे लसीकरण करावे. शेडमध्ये कोंबड्यांची गर्दी होणार नाही यांची काळजी घ्यावी. आजारी कोंबड्यांना लगेच वेगळे करावे. पशुवैद्यकाच्या सल्याने योग्य मात्रेत प्रतिजैविके द्यावी. प्रतीजैविकांचा कालावधी पूर्ण करावा.मध्येच प्रतिजैविके देणे थांबविल्यास आजाराचा पुन्हा उद्रेक होऊ शकतो. मृत कोंबड्यांना खोल पुरून टाकावे. उघड्यावर टाकू नये. अशा प्राकरे उपचार केले आणि काळजी घेतली जर फाउल कॉलरा या रोगावर नियंत्रण मिळवता येत.

## जीवामृत वापरा अन् रासायनिक खतांना ठेवा लांब



सध्या अनेक शेतकऱ्यांचा कल सेंद्रिय शेती करण्याकडे आहे. अशात जीवामृत हे पिकांसाठी वरदान ठरते. जीवामृत तयार करण्याची पद्धत अतिशय सोपी आहे. त्याचा जास्तीत जास्त वापर करणे फायद्याचे ठरते. जेणेकरून रासायनिक खतांवर होणारा खर्च कमी होऊन पर्यायाने, उत्पादन खर्चात घट होऊन उत्पन्न वाढते.

जीवामृताचे फायदे : पिकाची वाढ जोमदार होते आणि उत्पादनात चांगल्या प्रकारची वाढ दिसून येते. जीवामृत वापरल्याने पिकांची सहनशीलता वाढते. किड आणि रोगांना पिकापासून दूर ठेवण्याची प्रतिकारशक्ती उत्पन्न होते. जीवामृत वापरल्याने सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते. शेतामध्ये उपयुक्त जिवाणूंची संख्या प्रचंड वाढते. त्यामुळे पिकांचा किडींपासून बचाव होतो. जर आपण ठिबक सिंचन पद्धती वापरत असाल तर त्याद्वारेही, पिकांना ड्रीपद्वारे जीवामृत सोडता येते.

जीवामृत कसे तयार करायचे :

साहित्य – १) १० लिटर गोमूत्र किंवा पाच ते सात लिटर देशी गाईचे गोमुत्र घेतले तरी चालते. २) ५ किलोग्रॅम गूळ,३) गाईचे ५ किलोग्रॅम शेण, ४) २ किलोग्रॅम बेसन पीठ, ५) २ किलो ग्राम वारूळची माती किंवा वडा खालची माती घ्यावी. आणि २०० लिटर पाण्याची टाकी एवढे साहित्य जीवामृत बनविण्यासाठी आवश्यक असते.

जीवामृत बनवण्याची पद्धत :सुरुवातीला एका प्लास्टिकच्या ड्रममध्ये किंवा डब्यामध्ये पाच किलो गाईचे शेण घेऊन त्यामध्ये गोमूत्र घालावे. ते अशा पद्धतीने मिसळावे की त्याच्यामध्ये कोणत्याही प्रकारची गाठ राहणार नाही. दुसऱ्या भांड्यामध्ये पाणी घेऊन त्यामध्ये गूळ चांगल्या प्रकारे मिसळून घ्यावा. या मिश्रणामध्ये गूळ टाकण्याचा फायदा असा होतो की, तयार झालेल्या मिश्रणामध्ये जे उपयुक्त बॅक्टेरिया असतात ते पटकन ॲक्टिव्ह होतात. गूळ मिसळताना, त्याचे खडे राहणार नाहीत, ते पाण्यामध्ये पूर्णपणे एकजीव होतील अशा पद्धतीने मिसळावेत.

नंतर त्या गुळाच्या मिश्रणाला, तयार केलेल्या शेणयुक्त व गोमूत्रयुक्त मिश्रणामध्ये टाकून चांगल्या प्रकारे ते मिसळावे. नंतर या मिश्रणाला ढवळून घ्यावे.

या मिश्रणामध्ये दोन किलोग्रॅम बेसन पीठ टाकून चांगल्या पद्धतीने मिक्स करावे. थोड्या वेळापर्यंत हे मिश्रण चांगल्या प्रकारे हलवत राहावे. नंतर सगळे मिश्रण २०० लिटरच्या बॅरलमध्ये टाकून त्या बॅरलमध्ये पूर्ण पाणी भरावे. नंतर शेतातील बांधावरची मूठभर माती बॅरलमध्ये टाकून सगळे मिश्रण एकत्र करावे. हे तयार केलेले द्रावण सावलीत ठेवावे. हे द्रावण कमीत कमी दोन ते तीन दिवस सावलीत ठेवून सकाळ–संध्याकाळ काठीने ढवळून घ्यावे. सात दिवसांत जीवामृत वापरले तरी चालते. एक एकर क्षेत्रासाठी दोनशे लिटर जीवामृत हे पुरेसे ठरते.

## गाभण जनावरांची प्रसूतिपूर्व काळजी



गाभण जनावरांची प्रसूतिपूर्व काळजी घेतल्यास पुढे येणाऱ्या अडचणीवर मात करता येते. दुभत्या जनावरांबरोबर असणाऱ्या म्हशींचीही काळजी घेणे दुध व्यवसायाच्या दृष्टीने खूप आवश्यक आहे. म्हशींचा गाभण काळ दहा महिने दहा दिवस कालावधीचा तर गायींचा गाभणकाळ नऊ महिने नऊ दिवसांचा असतो. या काळात गाभण जनावरांचा खुराक समतोल असावा लागतो, त्यामध्ये प्रथिने, कर्बोदके, खनिज द्रव हे सर्व घटक समतोल प्रमाणात असणे गरजेचे असते.

गाभण जनावरांचे खाद्य व्यवस्थापन : भरपूर प्रमाणात हिरवा चारा उपलब्ध असणाऱ्या हिरव्या कुरणात गाभण जनावरांना चरण्यासाठी सोडावे. त्यामुळे गाभण जनावरांना ताजी वैरण खायला मिळते. बरोबरच मोकळ्या जागेत फिरायला मिळत असल्याने मोकळी हवा, सूर्यप्रकाश आणि आवश्यक तो शारीरिक व्यायाम होतो. हिरव्या चाऱ्याची सोय नसेल तर जनावरांना गोठ्यातच भरपूर प्रमाणात हिरवा चारा खाण्यास देता येईल, अशी व्यवस्था करावी. शेवटच्या दोन महिन्यांत गर्भाची वाढ झपाट्याने होते, त्यामुळे या काळात चाऱ्यात वाढ करावी. गर्भावस्थेच्या अंतिम काळात गाभण जनावराला स्वतःच्या पोषणाकरिता किमान एक ते दीड किलो पशुखाद्य द्यावे. गर्भाच्या वाढीसाठी आणखी एक ते दीड किलो जास्तीचे पशुखाद्य देण्याची गरज असते. अशा वेळी जास्त खाद्य दिल्याने गर्भाची वाढ चांगल्या प्रकारे होते.

भाकड काळाचे नियोजन : रेतन केलेल्या तारखेची नोंद महत्त्वाची असते, त्या नोंदीनुसार तिचे दूध काढणे बंद करावे. प्रसूतीच्या अडीच ते तीन महिने अगोदर दूध काढणे बंद करावे. दूध काढणे बंद केल्यामुळे दुग्ध उत्पादनासाठी लागणारे अन्नघटक गायीची झालेली शारीरिक झीज भरून काढण्यासाठी व गर्भातील वासराच्या वाढीसाठी उपयोगात आणले जाते. पुढील वेतातील दुधासाठी कासेची वाढ सुद्धा चांगल्या प्रकारे होईल व विण्यापूर्वी गायीचे व गर्भातील वासराचे आरोग्य चांगले राहील. विण्यापूर्वी प्रत्येक गाय अडीच ते तीन महिने भाकड असावी. देशी गायीच्या दोन वेतात दीड ते दोन वर्षे अंतर राहते, त्या जेमतेम ६ ते ७ महिनेच दूध देतात म्हणजेच विण्यापूर्वी १२ ते १७ महिने ही भाकड राहतात. मात्र संकरित गायी आणि त्यामध्ये पहिल्या वेतातील गायी वेत संपत आले तरी बरेच दूध देतात. अशा गायी आटवणे खूप आवश्यक असते. विण्यापूर्वी किमान अडीच महिने गाय भाकड राहिली पाहिजे नाहीतर त्यांचे पुढील वेतातील दूध उत्पादन निश्चितच कमी होते. गाय जर जास्त दुधाळ असेल तर याहून अधिक काळ म्हणजे तीन महिन्यांपर्यंत भाकड ठेवणे गरजेचे असते. गाय ३ ते ४ लिटर दूध देत असेल, तर धार काढणे एकदम बंद करावे.

याहून जास्त दूध देणार्या गायीचा खुराक बंद करावा. धार दिवसातून दोनदा काढत असल्यास ती एकदा आणि एकदा काढत असल्यास ती दोन तीन दिवसा आड काढावी. दूध कमी झाल्यावर एकदम धार थांबवावी. यामुळेही दूध कमी न झाल्यास गायीची हिरवी वैरण बंद करावी. आणि त्यानेही न झाल्यास एक दिवस पाणी कमी पाजावे हे उपाय योजण्यापूर्वी गायीला दुभत्या जनावरांपासून बाजूला काढून भाकड जनावरांमध्ये बांधावे. अशा रीतीने गाय आटल्यानंतर ती २–३ दिवसांत कास कमी करते, त्यानंतर तिच्या प्रत्येक सडात पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने प्रतिजैविक सोडावे.

यामुळे भाकड काळात गायीला काससूज आजाराचा धोका होणार नाही. गाय पूर्णता भाकड (आटल्यानंतर) झाल्यानंतर गरजेनुसार आहार परत सुरू करावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८५० : हेन्री वेल्स आणि विल्यम फार्गो यांनी 'अमेरिकन एक्सप्रेस'ची स्थापना केली.
१९१९ : रौलेट ॲक्ट पास झाला
१९२२ : महात्मा गांधींना असहकार आंदोलनाबद्दल ६ वर्षे तुरूंगवास
१९४४ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने ब्रह्मदेशमार्गे प्रवेश करुन भारताच्या ईशान्य सीमेवर ब्रिटिशांचा पाडाव करुन तिरंगा फडकावला.
१९६५ : अंतराळवीर अलेक्सी तिओनोवा हा अंतराळात चालला.
१९६९ : 'कॉसमॉस' हे मानवविरहित अवकाशयान रशियाने याच दिवशी अवकाशात सोडले
२००१ : सरोदवादक अमजद अली खान यांना 'गंधर्व पुरस्कार' तर तर बंगाली अभिनेत्री सावित्री चटर्जी यांना 'अप्सरा पुरस्कार' जाहीर.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५९४ : शहाजी राजे भोसले (मृत्यू: २३ जानेवारी १६६४)
१८५८ : रुडॉल्फ डिझेल – डिझेल इंजिनचा संशोधक (मृत्यू: १९१३)
१८६७ : महादेव विश्वनाथ धुरंधर – आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार व पोस्ट कार्ड आर्टिस्ट, कलेला वाहून घेतलेल्या या चित्रकाराने सुमारे ५,००० हून अधिक चित्रे काढली. (मृत्यू: १ जून १९४४)
१८६९ : नेव्हिल चेंबरलेन – इंग्लंडचे पंतप्रधान (मृत्यू: ९ नोव्हेंबर १९४०)
१८८१ : वामन गोपाळ तथा 'वीर वामनराव' जोशी – स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, 'राष्ट्रमत' आणि 'स्वतंत्र हिन्दुस्तान'चे संपादक, लेखक व नाटककार, त्यांची रणदुंदुभी व राक्षसी महत्त्वाकांक्षा ही नाटके प्रसिद्ध आहेत.
१९०१ : कृष्णाजी भास्कर तथा 'तात्यासाहेब' वीरकर – शब्दकोशकार, अनेक शैक्षणिक संस्थांचे संस्थापक.
१९०५ : मालती बेडेकर ऊर्फ 'विभावरी शिरुरकर'–लेखिका (मृत्यू: – २००१)
१९१४ : आझाद हिंद सेनेचे अधिकारी गुरुबख्श सिंह ढिल्लो यांचा जन्मदिन.
१९१९ : इंद्रजित गुप्ता – केन्द्रीय गृहमंत्री आणि कम्युनिस्ट पक्षाचे नेते (मृत्यू: २० फेब्रुवारी २००१)
१९२१ : एन. के. पी. साळवे – भारतीय राजकारणी, केंद्रीय मंत्री व बी. सी. सी. आय. चे अध्यक्ष (मृत्यू: १ एप्रिल २०१२)
१९३८ : बलबीरराज पृथ्वीराज कपूर तथा 'शशी कपूर' – अभिनेता
१९४८ : एकनाथ सोलकर – अष्टपैलू क्रिकेटपटू (मृत्यू: २६ जून २००५)
१९८९ : भारतीय क्रिकेट खेळाडू श्रीवत्स गोस्वामी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१ : इंग्लिश गणितज्ज्ञ ऑगस्टस द मॉर्गन.
१९०८ : सर जॉन इलियट – भारतातील हवामानशास्त्रविषयक कार्यामुळे प्रसिद्धी पावलेले ब्रिटिश हवामानशास्त्रज्ज्ञ. १८८७ ते १८९३ या कालावधीत ते भारत सरकारच्या हवामान खात्याचे प्रमुख होते.
१९४७ : जनरल मोटर्स आणि शेवरलेट कंपनी चे सहसंस्थापक विल्यम सी ड्युरंट यांचे निधन. (जन्म: ८ डिसेंबर १८६१)
१९५६ : प्रसिद्ध मराठी विद्वान नारायण शास्त्री मराठे यांचे निधन.
२००० : हिंदी चित्रपट क्षेत्रांतील प्रसिद्ध गायिका राजकुमारी दुबे यांचे निधन.
२००३ : ओस्बोर्न कॉम्पुटर कॉर्पोरेशन चे संस्थापक ॲडम ओस्बोर्न यांचे निधन. (जन्म: ६ मार्च १९३९).

## अमरवेल तणाचा असा करा बंदोबस्त



अमरवेल हे कंदमूळ वर्गातील पर्णहीन, पिवळसर रंगाचे तण आहे. या तणाच्या सुमारे १७० प्रजाती आहेत. हे तण संपूर्ण परोपजीवी असून, द्विदल वनस्पतींवर अवलंबून राहते. मिरची, मूग, उडीद, जवस, कपाशी, हरभरा तसेच कांदा पिकावर अमरवेल तणाचा प्रादुर्भाव आढळून येतो.

मागील काही वर्षांत अमरवेल किंवा अधरवेल या परोपजीवी तणाचा प्रादुर्भाव द्विदलवर्गीय पिकांवर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. बाल्यावस्थेत हा वेल गुंडाळी करून दुसऱ्या वनस्पतीच्या खोडावर चिटकतो व जमिनीपासून वेगळा होतो. त्यानंतर सूक्ष्म दातासारख्या तंतूच्या मदतीने त्या वनस्पतीमधील अन्नरस शोषून घेतो.

त्यामुळे प्रादुर्भावग्रस्त वनस्पतीची वाढ खुंटत जाते. परिणामी उत्पादनात मोठी घट येते. अमरवेलाचे बी २० वर्षांहून अधिक काळ जमिनीत सुप्तावस्थेत जिवंत राहू शकते. त्यामुळे बीजोत्पादन अवस्थेपूर्वी त्याचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. या तणाच्या बीला उगवणीसाठी अनुकूल १५ ते ३८ अंश सेल्सिअस तापमान मिळताच त्याची उगवण होते.

बी आकाराने १ ते दीड सेंमी इतके असते. वेल पूर्णतः मूळरहित असून पिवळसर, नारिंगी व पानेविरहित दोऱ्यासारखा दिसतो. मुख्यतः त्याच्या उगवण स्थानापासून २.५ ते ५ सेंमी दूरवरील द्विदल वनस्पतीवर चिकटतो. परंतु परिसरात द्विदल वनस्पती नसली तरी रोप ८ ते १० दिवसांपेक्षा जास्त काळ जिवंत राहू शकते. एक अमरवेल प्रतिदिन साधारण ७ सेंमीपर्यंत वाढून जवळपास ३ चौ.मी. क्षेत्र व्यापतो. साधारणतः ६० व्या दिवसापासून वेलाला बी लागण्याची क्रिया सुरू होते. या तणांच्या प्रादुर्भावामुळे पिकाचे १०० टक्क्यांपर्यंत देखील नुकसान होऊ शकते. मूग व उडीद ३१ ते ३४ टक्के, टोमॅटो ७२ टक्के, हरभरा ८५.७ टक्के व मिरची पिकात ६० ते ६५ टक्के उत्पादनात घट आढळून आली आहे.

व्यवस्थापन : अमरवेल या तणाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी प्रादुर्भावग्रस्त भागात सामूहिकरीत्या एकात्मिक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. प्रतिबंधात्मक, निवारणात्मक उपाय तसेच रासायनिक पद्धतींचा वापर प्रभावी तणनियंत्रणासाठी फायदेशीर ठरतो.

## फळबाग फुलवण्यासाठीचे विशेष तंत्रज्ञान



फळबागेच्या उत्तम वाढीसाठी योग्य खत व्यवस्थापन अत्यंत आवश्यक आहे. विद्राव्य खतांचा ठिबक सिंचनाद्वारे वापर (फर्टिगेशन) ही अत्यंत प्रभावी आणि आधुनिक शेतीसाठी उपयुक्त पद्धत आहे. यामुळे झाडांना गरजेप्रमाणे अन्नद्रव्ये मिळतात, खतांचा कार्यक्षम वापर होतो आणि पिकांची गुणवत्ता सुधारते.

विद्राव्य खत म्हणजे काय? : विद्राव्य खते म्हणजे पाण्यात सहज विरघळणारी खते, जी झाडांना ठिबक सिंचनाद्वारे दिली जातात. यामुळे अन्नद्रव्यांचा योग्य तो पुरवठा होऊन झाडांची चांगली वाढ होते. विद्राव्य खतांचा वापर केल्याने खतांची बचत होते आणि उत्पादनात वाढ होते.

फळबागेमध्ये विद्राव्य खतांचा महत्त्वपूर्ण उपयोग : फर्टिगेशन ही ठिबक सिंचन प्रणालीतून विद्राव्य खत पुरवठा करण्याची आधुनिक पद्धत आहे. यामुळे अन्नद्रव्यांचा ८०–९०% परिणामकारक वापर होतो, ज्यामुळे उत्पादन वाढते आणि गुणवत्ताही सुधारते. ३–४ वर्षांच्या झाडांसाठी वर्षातून दोन वेळा (डिसेंबर–जानेवारी किंवा मे–जून) १०–४० किलो शेणखत किंवा कंपोस्ट प्रति झाड वापरावे. त्यापेक्षा जास्त वयाच्या झाडांसाठी बहारानुसार ५० किलो शेणखत प्रति झाड द्यावे. निंबोळी पेंड प्रति झाड १ किलो दरवर्षी वापरणे उपयुक्त ठरते.

दैनिक पाणी व्यवस्थापन : ठिबक सिंचनाद्वारे झाडांना गरजेपुरतेच पाणी मिळते, त्यामुळे अति पाण्याचा वापर टाळता येतो आणि मुळांपर्यंत अन्नद्रव्ये सहज पोहोचतात.

योग्य प्रमाणात अन्नद्रव्ये दिल्यास मुळे मजबूत होतात आणि झाडाच्या वाढीला चालना मिळते.

हवामान आणि जमिनीच्या गुणवत्तेनुसार खत व्यवस्थापन : अन्नद्रव्यांची उपलब्धता ही जमिनीच्या तापमान, ओलावा, हवामानातील बदल, सामू, चुनखडीचे प्रमाण, सेंद्रिय कर्ब यावर अवलंबून असते. योग्य प्रमाणात विद्राव्य खतांचा वापर केल्याने झाडांना सर्व पोषकतत्व योग्य वेळी मिळतात.

फळबागेमध्ये विद्राव्य खतांच्या वापराचे फायदे : विद्राव्य खते झाडांच्या गरजेनुसार दिल्याने अन्नद्रव्यांचा संतुलित पुरवठा होतो. ठिबक सिंचनाद्वारे अन्नद्रव्ये दिल्याने पाण्याचा अपव्यय कमी होतो. सेंद्रिय पदार्थ आणि विद्राव्य खते यांचा एकत्रित वापर केल्याने जमिनीतील सूक्ष्मजीवांचे प्रमाण वाढते आणि मातीची गुणवत्ता सुधारते.खतांचा योग्य वापर केल्यास झाडांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि फळांचा आकार, रंग आणि चव सुधारते. विद्राव्य खतांचा नियंत्रित वापर केल्यास जमिनीतील नायट्रोजन आणि फॉस्फरस यांचे प्रमाण संतुलित राहते आणि जमिनीची ऱ्हास प्रक्रिया थांबते.

निष्कर्ष : फळबागेच्या निरोगी वाढीसाठी विद्राव्य खतांचा ठिबक सिंचनाद्वारे वापर (फर्टिगेशन) हा सर्वोत्तम पर्याय आहे. यामुळे झाडांना योग्य प्रमाणात अन्नद्रव्ये मिळतात, पाण्याचा अपव्यय टाळता येतो आणि फळांचे उत्पादन व गुणवत्ता वाढते

# वृक्ष संमेलन भरलेल्या सह्याद्री देवराई वनप्रकल्पाला घरघर

**दिड वर्षापासून झाडांना पाणी मिळेना; वनविभागासह जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष**

**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'बेशरमांची झाडे लावा' लक्ष्यवेधी आंदोलन**





बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि सिने पटकथा लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या आणि पहिले जागतिक वृक्षसंम्मेलन भरलेल्या सह्याद्री -देवराई वनप्रकल्पाकडे वनविभाग आणि जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष असुन वनप्रकल्पाला घरघर लागली असुन वाळवंट होण्याच्या स्थितीत असुन पाण्याअभावी झाडे वाळली आहेत त्यामुळे पाण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधुन निधीची तरतूद करण्यात यावी तसेच डोंगराला आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी आणि पालवण -पिंपळवाडी रस्त्याच्या दुरावस्थेमुळे मॉर्निंग वॉक साठी नागरीक तसेच योगा ग्रुपने मॅरेथॉन स्पर्धेकडे पाठ फिरवली असुन रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी या प्रमुख मागण्यांकडे जिल्हा प्रशासन व वनविभागाचे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१७ सोमवार रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ''बेशरमांची झाडांची लागवड करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पालकमंत्री अजित पवार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे, रामनाथ खोड, शेख मुबीन, पांडुरंग हराळे,शेख मुस्ताक ,शिवशर्मा शेलार आदी सहभागी होते.

बीड जिल्ह्यात दिड टक्का वनक्षेत्र असुन दुष्काळाचे वारंवार संकट ओढावत आहे.जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग रूंदीकरणाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झालेली आहे. या संकटावर मात करून वृक्ष चळवळ वाढीस लागावी म्हणून बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून ४० एकरात सह्याद्री देवराई वन प्रकल्प उभारला गेला. जगातील पहिले वृक्षसंम्मेलन याच ठिकाणी झाले या प्रकल्पातील १६ एकरात करवंद,पिंपळ,लिंब,महारूक, कांचन यासह स्थानिक प्रजातीच्या ६४ हजार विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.शिवाय १२ हजार झाडांचे घनवृक्षही येथे उभारण्यात आले होते.या प्रकल्पातुन आक्सिजन झोन तयार करून वृक्ष चळवळ निर्माण करण्याचा उद्देश होता.परंतु मागील दिड वर्षांपासून देवराईतील झाडांना पाणीच नसल्याने झाडे वाळली आहेत.जळु लागली आहेत.सह्याद्री देवराई प्रकल्पातील झाडे जगवण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधुन २०१७ नंतर सुरूवातीला केवळ ३ वर्षच निधी मिळाला.त्यानंतर निधीचे प्रयोजन संपले. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीमधुन पाण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी. दोन वर्षांपूर्वी बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेटचे चेअरमन सुरेश कुटे यांच्याकडून सह्याद्री देवराई प्रकल्पातील झाडांसाठी २ दिवसाआड १२ हजार लिटर पाण्याचे मोफत टँकर दिले जात होते ते सध्या बंद आहेत.रोटरी क्लब, विविध सामाजिक संस्थांच्या मदतीने छोटे मोठे टँकर देऊन पाणी उपलब्ध करून देण्यात येत होते सध्या तेही बंद आहे. ३ वर्षांपूर्वी पालवण येथील सह्याद्री देवराईच्या डोंगराला १२ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारच्या वेळी अचानक लागलेल्या आगीत १८ प्रजातींची ३२३ झाडांना आगीची झळ बसुन १३ मोठ्या झाडांचे नुकसान झाले होते तर १० मार्च २०२२ रोजी गवळवाडी रोपवन आगीत भस्मसात झाले होते तर दि.२५ मार्च २०२३ रोजी लागलेल्या आगीत शासनाच्या ३३ कोटी वृक्षलागवड योजनेंतर्गत २०१९ मध्ये पिंपळवाडी रस्त्यावर गवळवाडी येथील सर्व्हे नंबर ३७८ मधील २५ हेक्टर क्षेत्रात उभारलेल्या रोपवनाला दि.०९ मार्च २०२३ रोजी आग लागुन १० एकर क्षेत्रातील ४-५ हजार झाडे जळून खाक झाली होती. त्यामुळे आगी लागण्याच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. सह्याद्री देवराई हा हिरवळीने नटलेला परिसर असून येथे वळणदार घाट आणि शुद्ध ऑक्सिजन मिळत असल्याने बीड शहरातील नागरीक मॉर्निंग वॉक साठी मोठ्या प्रमाणामध्ये येत होते परंतु देवराईकडे जाणारा पालवण ते पिंपळवंडी पर्यंत रस्ता उघडल्याने या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांची संख्या रोडावली आहे. बीडच्या योगा ग्रुपने या ठिकाणी तीन वेळा मॅरेथॉन घेतली होती. या स्पर्धेला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला परंतु खराब रस्ता असल्याने धावपटुंनी सुद्धा देवराई सध्या पाठ फिरवल्याचे पहायला मिळते. त्यामुळे तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी.

## काला हा मृत्यू लोकात साधु संतांच्या कृपेमुळे मिळतो-संतोष महाराज मोरे



आष्टी। प्रतिनिधी

संसारातील कोणत्याच गोष्टींनी कोणाचीही तृप्ती होत नसते.संसार सुखाचे मागे जाऊनही मानव अखेर अतृप्तच राहत असतो.आपण श्रीकृष्णाच्या चरित्राचे उच्चारण करतो मात्र व्यवहारात आणि आचरणात मात्र विसंगती आढळून येते कृष्णाच्या चरित्रातील दहीदुधाची चोरी या गोष्टीतून त्यांनी अध्यात्म कारण, भक्ती कारण, समाजकारण आणि राजकारण अशी चार कारणे आहेत असे सांगत श्रीकृष्णाने गोकुळात केलेले चरित्र उच्चारले जाते '' केले देवे गोकुळी दश चरित्रे '' उच्चारली जावीत असा वारकरी संप्रदायाचा, काल्याच्या कीर्तनाचा नियम आहे.दुर्मिळ असणारा काला आपल्याला मृत्यु लोकात साधु संतांमुळे मिळतो असे प्रतिपादन ह.भ.प.संतोष महाराज मोरे यांनी केले.

आष्टी शहरातील वसंतनगर येथील श्री जगतगुरु तुकाराम महाराज मंदीरात सुरु असलेल्या ३७५ वा.त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी संत तुकाराम महाराज बीज अखंड विठ्ठल नाम सप्ताह सोहळ्यात ह.भ.प. संतोष महाराज मोरे बोलत होते. यावेळी राजेंद्र धोंडे, सरपंच सौ.शालन मुळे,माजी सरपंच सौ.आदिकाताई लोखंडे,सौ.चंद्रकला नालकोल,सौ.धोंडे, सौ.मुक्ता खेडकर, छानबाई पाटील,राम ससाणे सर,घनशाम खलासे,त्रिंबक ईजारे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, अशोक डोके सर, किसनराव रासकर, हरिचंद्र बोडखे सर, सोनाजी बनकर महाराज,सोपान जोगदंड,अमोल बळे महाराज,हौसराव आजबे महाराज, उध्दव विधाते,लाला महाराज राक्षे, अशोक काकडे, गोपीनाथ पोकळे, बाळासाहेब रासकर,प्रा.सुभाष रासकर,प्रकाश खेडकर,पंडुरंग पोकळे,बलभीम धोंडे,शिवदास केरुळकर,प्रा.सदीप रासकर,नानासाहेब तवले,अनारसे सर, शाहुराव लाड, पुष्पाताई शिंदे, मुक्ताताई गणगे, फुलाबाई,कुसुमताई काळे,आदि मान्यवर उपस्थित होते. '' कंठी धरीला कृष्णमणी । अवघा जनी प्रकाश, काला वाटू एकमेका। वैष्णव निका संभ्रम, वाकुलिया ब्रम्हादिकां । उत्तम लोका दाखवूं तुका म्हणे भूमंडळी । आम्ही बळी वीर गाढे या संत तुकाराम महाराज यांच्या अंभगावर काल्याचे कीर्तन केले.पुढे बोलताना ह.भ.प. मोरे महाराज म्हणाले की,काला तीन प्रकारचा असतो.स्थुल देहासाठी दही -लाईचा काला,सुक्ष्म देहासाठी हरीनामाचा काला आणि कारण शरीरासाठी (आत्मस्वरुपाचे अज्ञान) जीव शिवाचा काला असतो.स्थुल कृपेचा काला,सुक्ष्म कृपेचा काला, द्रुक (दर्शन, दृष्टी) कृपेचा काला आणि संकल्प कृपेचा काला असतो.संत महात्मे देवाची अनुभुती घेतात आणि ईतर भक्तांना देवाची अनुभुती करुन देतात असेही ह.भ.प.मोरे महाराज यांनी सांगितले.

## राजे मल्हारराव होळकर प्रतिष्ठाण चा वधु-वर परिचय मेळावा-प्रा.भगवान माने



बीड। प्रतिनिधी

राजे मल्हारराव होळकर सा.प्रतिष्ठाणच्या वतीने दि.१६ मार्च २०२५ रोजी वधुवर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन मा.डॉ.प्रा.यशपाल भिंगे, मौर्य प्रतिष्ठाण नांदेड, सह प्रा.सर्जेराव काळे मा.जिल्हाध्यक्ष (कॉ.आय), मा.हनुमंत काळे मा.कृषीअधिकारी, मा.मनोहर पिसाळ उद्योजक, मा.शारदाताई पांढरे जालना, मा.शिवाजीराव राऊत मा.जि.प.अध्यक्ष, मा.पोले रामचंद्र नि.मुख्य वनरक्षक, मा.गावडे अशोक, मा.मतकर आण्णासाहेब रासप जिल्हाध्यक्ष, डॉ.अर्जुन मासाळ प्राचार्य अहिल्यादेवी बीएड कॉलेज गढी, ह.भ.प.निर्मळ रामदास, मा.लासुने सर, शेंडगे देवीदास, प्रा.भगवान माने कार्याध्यक्ष राजे मल्हारराव होळकर प्रतिष्ठाण, मा.अंकुशराव येळे, अध्यक्ष राजे मल्हारराव होळकर प्रतिष्ठाण, ॲड.राजू शिंदे सचिव, मा.हनुमंत काळे अर्थ व नियोजन समिती न.प.पाटोदा यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरूवात करतांना होळकर शाहीचे संस्थापक सुभेदार मल्हारराव होळकर यांची ३३२ वी जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी डॉ.यशपाल भिंगे यांनी पोटशाखा सोडून फक्त धनगर शब्द वापरून येथून पुढे एकत्र येण्याचे आवाहन केले. यावेळी आयोजन समितीकडून भोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या मेळाव्यात वधुवराच्या मुलाखती, संवाद चर्चा सत्र संपन्न झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ.कोरडे ताई, पो.अनिल शेळके यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा.राजेंद्र गाडेकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून वधु-वर, पालक उपस्थित होते. कार्यक्रम योग्य नियोजन केल्याबद्दल पालकांनी नियोजन समितीचे आभार व्यक्त केले. यावेळी आयोजन समितीचे प्रा.भास्कर चादर, विशाल देवकते, सौदलकर बापु, शहादेव धापसे, प्रकाश देशमुख, ॲड.सचिन कोळेकर, गडदे सर, माणिक अनुसे, प्रतिक माने, अजित माने, अभिषेक शिंदे यांच्यासह समाज बांधवाच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

## बीड येथील नवीन व्हीआयपी विश्रामगृह बांधकाम पूर्ण करण्यास कंत्राटदाराची टाळाटाळ

### बाळराजे कन्स्ट्रक्शनला काळया यादीमध्ये टाकण्यात यावे -अजय सरवदे

बीड। प्रतिनिधी

बीड येथे नवीन व्हीआयपी विश्रामगृह व अस्तित्वातील विश्रामगृहाचे नूतनीकरण करणे बाबतचे काम सुरु आहे. गेल्या ३ वर्षापासून सदरील विश्रामगृहाचे कामास बाळराजे कन्स्ट्रक्शन यांना १७ मार्च २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदरील काम पूर्ण करण्याचा कालावधी हा १२ महिन्याचा होता निविदा रक्कम ५८३.४९ लक्ष एव्हडी होती सदर कामाची निविदा स्वीकृती ०.५०% दराने ५८०.६२ लक्ष खर्च करण्यात येणार होता.

शासकीय विश्रामगृहाचे काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे होत नाही तसंच कार्यक्रम आदेशामध्ये नमूद मुदतीमध्ये पूर्ण करणे अपेक्षित असताना ते केले नाही तसेच सदर प्रकरणी रिवाईज अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे नेमके कशासाठी रिवाईज अंदाजपत्रक सादर केले आहे याची सखोल चौकशी होण्यापेक्षा आहे. सदर प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मागवली असताना माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे.

कार्यारंभ आदेश दिल्यानंतर त्यामध्ये कालावधी दिला जातो त्या कालावधीमध्ये काम झाले तर ठीक नाही तर संबंधित कन्स्ट्रक्शनला काळया यादीमध्ये टाकण्यात येते किंवा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येते परंतु सदरील काम गेल्या ३ वर्षापासून सुरू असून यामध्ये बाळराजे कन्स्ट्रक्शन यांच्यावर कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. विविध कारणे पुढे करत संबंधित अभियंता कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून आले आहे.

## आदित्य पॉलीटेक्निकच्या ४३ विद्यार्थ्यांनी दिली नाशिकच्या सुमागो इन्फोटेकला भेट



बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षीकांधून मिळालेली माहिती त्यांच्या कायम स्मरणात राहते आणि ती त्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्वाची असल्याने आदित्य अभियांत्रिकीच्या ६ प्राध्यापकांनी ४३ विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट थेट नाशिकच्या सुमागो इन्फोटेक प्रा.ली. येथे दिली. तेथे विद्यार्थ्यांनी वेब डेव्हलपमेंट, सॉफ्टवेअर, मोबाईल, प्लिकेशन, युआय युएक्स डिझाइन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल मार्केटिंगसह उद्योगातील व्यावसायिक वातावरणाचा अनुभव प्रत्यक्ष घेतला.

आदित्य शिक्षण संस्थेतील प्रत्येक विद्यार्थी परिपूर्ण होऊन बाहेर पडला पाहिजे यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा हे नेहमीच प्रयत्न करत असून प्राचार्य, प्राध्यापकांना ते वेळोवेळी तशा सुचना देतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य शिक्षण संस्थेत विविध उपक्रम राबवले जातात.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एस.एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ४७३/२०२५**

**ॲड.ए.पी. गंडले**

**छबुबाई मारोती वीर वि. निरंक**

अर्जदार -१ छबुबाई भ्र. मारोती वीर, वय ७१ वर्षे, धंदा-घरकाम, रा.पाली ता.जि.बीड २. कलावती भ्र.बाबु वारभवन, वय ५५ वर्षे, धंदा काही नाही रा.आर.एस.जे., जेतवन नगर, सिध्दार्थ शाळेच्या बाजुला, मोहने ता. कल्याण जि.ठाणे ह.मु. पाली ता.जि.बीड अंध असल्याने पालनकर्ती आई छबुबाई भ्र. मारोती वीर

गैरअर्जदार निरंक

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत मारोती पि. देवराव वीर यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत मारोती पि. देवराव वीर हे दिनांक १५/१२/२०२४ रोजी पाली ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २. ही मयताची विवाहीत मुलगी आहे. यांच्या शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे मारोती पि. देवराव वीर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मारोती पि. देवराव वीर रा.पाली ता.जि.बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख ०२/०५/२०२५. आज दिनांक १७/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

आदेशावरून

स्वाक्षरित **क लिपीक** (शिक्का) स्वाक्षरित **अधिक्षक**

दिवाणी न्यायालय व. स्तर बीड



**जाहीर प्रगटन**

**मा. श्री.व्ही.सी.जोशी सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ४९५/२०२५**

**ॲड उजगरे एस. आर. यांच्या मार्फत**

**रुक्मीनबाई मनोहर मोरे वि. निरंक**

ज्यापेक्षा मनोहर पि. रघुनाथ मोरे, हे दिनांक ०६.११.२०२४ रोजी रा.गुंधा, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१ रूक्मिनबाई भ्र.मनोहर मोरे, वय-७३ वर्षे, धंदा घरकाम, रा.गुंधा, ता.जि. बीड. २ पांडुरंग पि.मनोहर मोरे, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा.गुंधा, ता.जि. बीड. ह.मु. वडगांव रोड विश्रांतवड, आळंदी देवाची, पुणे.

अर्जदार क्र. १ ही मयत नामे मनोहर पि. रघुनाथ मोरे, यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. मयतास मुलगी नाही. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत मनोहर पि. रघुनाथ मोरे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २३/०४/२०२५ आहे.**

**आज दिनांक १५ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.**

आदेशावरून

स्वाक्षरित **क लिपीक** (शिक्का) स्वाक्षरित **अधिक्षक**

दिवाणी न्यायालय व. स्तर बीड



**जाहीर प्रगटन**

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ४६५/२०२५**

**(मार्फत विधिज्ञः- श्री एस एम सोंडगे)**

अर्जदार :-१. बापुराव पि. दादाराव ढोकणे, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. नागापूर बु., ता.जि.बीड,

२. अंजना भ्र. विदयाधर शेळके, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. गजानन महाराज मंदिराजवळ, अरविंद चिंचवडे चाळ, नलावडे वस्ती, बिजली नगर, चिंचवड, पुणे, ता.जि.पुणे.

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे दादाराव पुंजाजी ढोकणे हे / या दि. ०६/०१/२०१३ रोजी नागापुर बु.. ता. जि. बीड येथे मयत असुन अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा आहे. तर अर्जदार क्र. २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्याचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**आज दिनांक:- १७/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

**पुढील तारीखः २४/०४/२०२५.**

आदेशावरून

स्वाक्षरित **क लिपीक** (शिक्का) स्वाक्षरित **अधिक्षक**

दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


## ज्ञानराधा बँक बंद पडल्यामुळे पिग्मी एजंटावर बँकेच्या दारात वडापाव विकण्याची वेळ



पाटोदा । प्रतिनिधी

ज्ञानराधा बंद होऊन दोन वर्षे झाले तरीही लोकांचे ठेवी परत मिळण्याच्या आशा मावळ्या. सुरेश कुठे अर्चना कुठे यांनी लोकांना जास्त व्याजाचे आम्हीच दाखवून गोरगरिबाच्या ठेवी ठेवून लोकांची फसवणूक केली. असाच एक पाटोद्यातील होतकरू तरुण प्रकाश चौरे. इमानदार व विश्वासू म्हणून पाटोदा व्यापार पेठेत.त्यांची ओळख होती. पिग्मी एजंट. म्हणून.ज्ञानराधा बँकेत. कार्य करत होते. अचानक बँक बंद पडल्यामुळे. त्यांच्यापुढे उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. प्रकाश चौरे हे उच्चशिक्षित सुशिक्षित बेरोजगार असून. अनुराधा बँकेमध्ये बारा तेरा वर्षे पिक विमा योजना म्हणून काम पाहत होते. पण अचानक बँक बंद पडल्यामुळे घर परिवार चालवायचा कसा हा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झाला. त्यांना एक मुलगा एक मुलगी त्यांचं शिक्षण आणि लग्न. कसं भागवायचं हा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झाला व घरची परिस्थिती हालाखीची असल्याने ते बँकेमध्ये बिग मॅजिक म्हणून काम करत होते.

व त्यांनी परिस्थितीवर मात करायचे ठरवले. परिस्थितीला हार न मानता जिद्दीने त्यांनी आपला वडापावचा व्यवसाय चालू बँकेच्या दारात केला. बँक बंद पडल्यामुळे बँकेने त्यांना वडापाव विकण्याची वेळ आज त्यांच्यावर आली. सुरेश कुठे व अर्चना कुठे हे पाप तुम्ही कुठे फेडताल.

# कापशी तलावाची उंची वाढवल्याने ऊसतोडणीसाठी स्थलांतरीतांचे प्रमाण कमी होईल

## २५० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार –आ.सुरेश धस



आष्टी । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षांत दोन आमदार मतदार संघाला मिळाले पण एकाही आमदाराला या कापशी तलावाची उंची वाढवण्याचे काम करू शकले नाहीत.. तलावाचे उंची वाढवण्याचे काम झाले असते तर या गावातील कमीत कमी ५० कोयते ऊस तोडायला गेले नसते..त्यामुळे स्थलांतरणाचे प्रमाण कमी झाले असते.आता या तलावाची उंची वाढवून २५० हेक्टर जमिन ओलीताखाली येणार असल्याने गावक-यांनी या कामांसाठी हेवेदावे बाजूला ठेऊन एकत्र येऊन सहकार्य करावे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

आष्टी तालुक्यातील कापशी येथे मृद व जलसंधारण विभाग बीड,१०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेचा शुक्रवार दि.१४ रोजी सकाळी ११ वा. साठवण तलावाचे गणेश गडाचे महंत ह.भ.प.काशीनाथ महाराज व धर्मराज गडाचे महंत ह.भ.प.रोहिदास गर्जे महाराज यांच्याहस्ते भूमीपुजन करण्यात आले. यावेळी आमदार सुरेश धस बोलत होते.यावेळी जि.प.सदस्य अमर निंबाळकर आष्टी तालुका दुध संघाचे चेअरमन संजय गाढवे,माजी सभापती छत्रगुण मरकड, एन.टी.गर्जे,नारायण वनवे,बाबु गर्जे,नवनाथ गर्जे,नवनाथ नागरगोजे, लक्ष्मण ननवरे यांच्यासह आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलतांना आ.धस म्हणाले,मला विकासाच्या कामात टिका टिप्पणी करायची नाही पण दहा वर्षांत मतदार संघाला दोन आमदार झाले.त्यांना हा कापसीचा तलाव का दिसला नाही जर हा तलाव झाला असता तर किमान ५० कोयता तोडणारांची संख्या कमी झाली असती आता शेतक-यांनी या तलावासाठी शेतक-यांनी सहकार्य करून एका वर्षात तलावाचे काम मार्गी लावतो.

हा साठवण तलाव अतिशय नॅचरल साइटवर असून या साठवण तलावामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे काम होणारा असून कापसी परिसरातील क्षेत्र ओलीताखाली जाणारा असल्याने मला मनस्वी आनंद होत असून अनेक दिवसाचे ही मागणी आज पूर्णत्वाकडे जात असल्याने गाव पुढा-यांनी गावातील तलावाच्या अडचणी सोडवा प्रशासकीय अडचणी मी सोडतो असा शब्दही आ.धस यांनी दिला. ह.भ.प.काशीनाथ महाराज म्हणाले,आमदार सुरेश धस यांची मतदार संघात नाळ जुळलेली असून,त्यांनी विकासाचे राजकारण केले व करत आहेत. विकासाचं दृष्टिकोन असलेलं हे व्यक्तिमत्व आहे. यावेळी व्हाईट चेअरमन अशोक गर्जे,सुंदरलाल गर्जे,सरपंच महाडिक, सरपंच नंदकिशोर करांडे, सरपंच विकास पवार,सरपंच अशोक इथापे, फारुख मामा, बबन तरटे, शेषराव गर्जे फौजी, पोपट गर्जे,रेवननाथ खाडे, मारुती डीसले, नितीन नाकाडे, वैभव गोल्हार, धनंजय तरटे,शिवाजी गर्जे, काकासाहेब गर्जे, आश्रुबा खलाटे, माणिक दहिफळे, अशोक तरटे, श्रीराम केदार आदीसह कापसी व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिवसेना (उठाबा ) पक्षाच्या जिल्हाप्रमुखपदी उल्हास गिराम यांच्या निवडी निमित्त शुभेच्छा देतांना खरेदी विक्री संघांचे चेअरमन जगदीशजी काळे, दिनकरजी कदम, अरुण नाना डाके, विलास बापु बडगे, सखाराम मस्के, वसंत सानप, अरुण बोगाने, कलंदर पठाण आदी...

# व्याजाच्या पैशांसाठी तरुणाचे अपहरण करुन अमानुष मारहाण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील हनुमान नगर येथे राहणाऱ्या ओंकार माने (वय २२) या तरुणाला व्याजाच्या पैशांसाठी अपहरण करून अमानुष मारहाण करण्यात आली. सदर घटना १४ मार्च रोजी रात्री घडली असून, याबाबत अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ओंकार माने याच्या फिर्यादीनुसार, त्याने मित्राकडून वीस हजार रुपये उसने



घेतले होते. हे पैसे परत करण्यासाठी रक्कम शिल्लक नसल्याची अडचण त्याने अनिकेत औताडे यास बोलून दाखवली. तेंव्हा अनिकेतने माझा भाऊ जयपाल उर्फ महादू औताडे हा व्याजाने पैसे देतो, तू तुझ्यासाठी २० हजार आणि माझ्यासाठी ५० हजार अशी रक्कम घे, मी माझी रक्कम आणि व्याज फेडतो असे ओंकारला सांगितले. त्याच्यावर विश्वास ठेऊन ओंकारने महादू कडून याच्याकडून ७० हजार रुपये व्याजाने घेतले. मात्र, सात टक्के दराने घेतलेल्या या कर्जावर सतत स्वतःचे आणि अनिकेतचे व्याज भरावे लागत असल्याने ओंकार आर्थिक अडचणीत सापडला. यापुढे तुझे पैसे भरणे शक्य नसल्याचे त्याने अनिकेत याला सांगितले असता, त्याने आपल्या साथीदारांसह ओंकारला धमकावत जबरदस्तीने कारमधून उचलून नेले. त्यानंतर ओंकारला

जबरदस्तीने कारमधून उचलून नेले. त्यानंतर ओंकारला सेलू आंबा येथील एका ढाब्याच्या मागील शेतात नेण्यात आले. तेथे महादु औताडे व त्याच्या साथीदारांनी ◀◀ पान ३ वर

# आष्टीत अवैध धंदे जोमात पोलीसांचे दुर्लक्ष

## एसपीसाहेब आष्टीकडे लक्ष द्या

म्हसोबावाडी (प्रतिनिधी)

आष्टी शहरासह तालुक्यात अवैद्य दारू विक्री, अवैध वाळू विक्री, मटका, गुटखा यासारख्या समस्याकडे पोलिस प्रशासनाने सपशेल दुर्लक्ष करत असून चिरीमिरी घेण्यामध्ये ते धन्यता मानत असल्याचे दिसत आहे याकडे बीडचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक कॉवत साहेब तुम्ही तरी लक्ष द्या अशी मागणी सामान्य नागरिकातुन होत आहे



आष्टी तालुक्यात आष्टी शहरासह कडा हे दोन महत्त्वाचे गाव असून आष्टी मध्ये पोलीस स्टेशन व कडा येथे पोलिस चौकी असून मात्र नागरिकासमोर खूप मोठ्या समस्या आहेत. अवैध दारूविक्री, वाळु विक्री, गुटखा, मटका यासारख्या व्यसनाने अनेकाचे संसार उद्धस्त झाले आहेत या अवैध धंदेवाल्याला अभय कोणाचा ? पोलिस कर्मचारी यांच्या आशिर्वादाने हे धंदे जोमात सुरू असून यावर कारवाई करण्याची मागणी सामान्य नागरिकांतून अनेक वेळा करण्यात येऊन सुद्धा याकडे पोलिस प्रशासन सपशेल दुर्लक्ष करत असून ते फक्त राज्यमार्गावरील शहराच्या बाहेर पाच सहा किलोमीटर अंतरावर एक-दोन शिपाई उभे राहून मालवाहतूक, चारचाकी वाहने यांना आढळून चिरीमिरीची मागणी करत आहेत त्यामुळे बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक कॉवत साहेब तुम्ही तरी याकडे लक्ष द्या अशी मागणी नागरिकाकडून होत आहे.

## गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतनानिमीत्त रक्तदान शिबीर

माजलगाव । प्रतिनिधी

प. पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर च्या वतीने श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊलींच्या अभिष्टचिंतन निमित्त दि.१९ मार्च बुधवार रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर प. पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर येथे सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. या रक्तदान शिबीरात सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले यांनी केले आहे.

दि. १९ मार्च ते ३० मार्च दरम्यान सध्या मुळव्याध, भगंदर,नासर, बालरोग,सर्व महिला रोग, मासिक पाळी चे आजार,वंध्यत्व, पोटाचे विकार, वृध्दपकाळातील आजार,मधुमेह, पंचकर्म यासह विविध प्रकारच्या आजारांचे मोफत तपासणी शिबिर चालू आहे या शिबीराचा माजलगाव शहरासह तालुक्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले,रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रलचे अध्यक्ष पांडुरंग चांडक,सचिव प्रभाकर शेटे तसेच श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे ◀◀ पान ३ वर

# जेबापिंप्री येथे श्री संत बाळूमामा पालखी सोहळ्याचे आगमन

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जेबापिंप्री येथे श्री संत बाळूमामा पालखी सोहळा (बग्गा) क्रमांक ९ चे आगमन १६ मार्च रविवार रोजी सायंकाळी वाजत - गाजत, भंडाऱ्याची उधळण करत मोठ्या उत्साहात झाले आहे. हा पालखी सोहळा जेबापिंप्री येथे २३ मार्च रविवार पर्यंत मुक्कामी असणार आहे तरी जेबापिंप्री, हिंगणी (खुर्द), पालसिंगण, चांदेगांव, चांदणी, देविबाभुळगांव, जेबा, हातोला, पांगरी, आणि पंचक्रोशीतील भाविक, भक्तांनी या पालखी सोहळयाच्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे जेबापिंप्री ग्रामस्थांच्यावतीने आवाहन करण्यात येत आहे.



या पालखी सोहळ्यात दैनंदिन कार्यक्रम हा दररोज सकाळी नऊ वाजता श्रींची आरती व दिवसभर महाप्रसाद तसेच दररोज सायंकाळी सहा ते सात या वेळेत हरिपाठ आणि सायंकाळी सात ते नऊ या वेळेत बाळूमामाच्या जीवन चरित्रावर प्रवचन, कीर्तन व आरती होईल. आरती नंतर महाप्रसाद होईल. वरील प्रमाणे पालखी सोहळ्याच्या कार्यक्रमाचे स्वरूप असल्याची माहिती पालखी (बग्गा) क्रमांक ९ चे प्रमुख कारभारी आप्पा माळी, आप्पा पाटील यांनी सांगितले. या कार्यक्रमाचा श्रींच्या आरती, दर्शन, प्रवचन, कीर्तन व महाप्रसादाचा जेबपिंप्री आणि पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा. असे आवाहन जेबापिंप्री ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

**देव निघाले देवाच्या भेटीला**

श्री संत बाळूमामा हे श्री संत माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या भेटीला एकादशी, अमावस्या व गुढीपाडवा या त्रिवेणी संगमाच्या शुभ मुहूर्तावर २३ मार्च रोजी जेबापिंप्री येथून पालखी चाकरवाडीला प्रस्थान करणार आहेत. अशा प्रकारे देव देवाच्या भेटीला जाणार आहेत.

# विकास बनसोडे याच्या मारेकऱ्यास फाशी द्या - उपसभापती श्रीहरी मोरे

माजलगाव । प्रतिनिधी

ट्रक चालवुन आपली व कुटूंबीयांची उपजिवीका भागविणा-या विकास बनसोडे या २५ वर्षीय तरूणास मारणा-या आरोपींना तात्काळ अटक करुन कठोर शासन करुन फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केली आहे.



मुळचा जालना येथील विकास बनसोडे हा पिंपरी घुमरी ता.आष्टी येथील भाउसाहेब क्षिरसागर यांच्या ट्रकवर चालक म्हणुन काम करत होता.भाउसाहेब क्षिरसागर यांच्या मुलीशी त्याचे प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून क्षीरसागर कुटुंबीयाने बनसोडे यास पकडुन घराजवळील पत्र्याच्या शेडमध्ये बांधुन टाकत दोन वायाराच्या सहाय्याने विकासला बेदम मारहाण केली. यातच त्याचा मृत्यु झाला आहे. ◀◀ पान ३ वर

# विकास बनसोडे हत्या प्रकरणातील आरोपींना फासावर लटकवा –पप्पू कागदे

बीड/प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात पिंपरी घुमरी येथे विकास बनसोडे या दलित युवकाची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आली असून सदरील घटना माणुसकीला काळिमा फासणारी आहे. त्यामुळे या प्रकरणात दोषी असलेल्या उर्वरित आरोपींना तातडीने अटक करण्यात यावी.आशा मागणीचे निवेदन रिपाइं शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक यांना सोमवार (दि.१७) मार्च रोजी दिले.



## रिपाइं शिष्टमंडळ पोलीस अधीक्षकांना भेटले

दरम्यान विकास बनसोडे हत्या प्रकरणातील आरोपींना फासावर लटकवा अशीही मागणी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केली.

पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विकास बनसोडे हा दलित तरुण बोरगाव, ता.भोकरधन,जिल्हा जालना येथील आहे.गेल्या काही वर्षांपासून तो बीड जिल्ह्यातल्या, आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथे एका व्यक्तीच्या इथे ट्रक चालक म्हणून कामास होता. परंतू ट्रक मालकाने त्याला दोन दिवस बांधून ठेवून जबर मारहाण केली. त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर विकास बनसोडे हत्या प्रकरणात दहा जणांवर ◀◀ पान ३ वर



# भावसार समाजाच्या वतीने रक्तदान शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

हिंगलाज माता प्रगट दिनाच्या निम्मिताने बीड जिल्हा भावसार समाजाचे सचिव अनिल सूत्रे यांच्या संकल्पनेतून दिनांक १६ मार्च रोजी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

या मध्ये अंतर्गत रक्तातील वेगवेगळ्या चाचण्या शिबिर मध्ये झाल्या. हे शिबिर भावसार पंच वाडा, बीड येथे संपन्न झाले. बीड भावसार समाजाचे आरोग्य समिती प्रमुख अशोकराव लोखंडे व बालाजी रंगदळ यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. सदरील शिबिरामध्ये एकूण ८७ समाज बांधवांनी सहभाग ◀◀ पान ३ वर

# कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडा-राजेभाऊ फड यांचे प्रशासनाला पत्र

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

माहे मार्च संपत आला असून उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. एप्रिलपर्यंत उन्हाची दाहकता मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. जनावरांसाठी पाण्याची मोठी समस्या निर्माण होऊ लागलेली आहे. त्याचप्रमाणे काही भागातील जलस्त्रोत पातळीही खालावली असल्याने पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेऊन कन्हेरवाडी लघु सिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.



राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्हाधिकारी, बीड तसेच गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता यांना पत्र लिहिले असून त्यात म्हटले आहे की, सद्य स्थितीत निर्माण झालेली पाण्याची कमतरता आणि संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे. जेणेकरून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होईल तसेच कन्हेरवाडी गाव, जिरेवाडी, बँक कॉलनी, समता नगर, जलालपूर, शंकर - पार्वती नगर, इंदपवाडी, ब्रह्मवाडी भागातील जलस्त्रोत पातळीत वाढ होऊन याचा नागरिकांना दिलासा मिळणार आहे. करिता आपण या मागणीचा गांभीर्यपूर्वक विचार करावा आणि योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करून नदीपात्रात पाणी सोडावे अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित मागणीचा प्रशासकीय स्तरावर योग्य विचार करून निर्णय घ्यावा अन्यथा लोकाग्रहास्तव लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याची वेळ येईल असाही इशारा त्यांनी दिला आहे.

## पद्म पुरस्कार वर्ष २०२६ साठी नामांकने सादर करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला प्रतिष्ठित अशा पद्म पुरस्कारांची घोषणा होत असते. पद्म पुरस्कारांची नामांकने केंद्रीय गृह मंत्रालयाने सादर करण्याचे आवाहन केले असून याबाबत प्रक्रिया १५ मार्च २०२५ पासून प्रारंभ झाली आहे. नामांकने सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२५ आहे. पद्म पुरस्कारांसाठीचे नामांकने (://..). या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टवर ऑनलाईन सादर केली जातील.

देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांमध्ये पद्मविभूषण, पद्मभूषण, आणि पद्मश्री याचा समावेश होत असून हे पुरस्कार कला, साहित्य, शिक्षण, क्रीडा, आरोग्य, सामाजिक कार्य, विज्ञान, अभियांत्रिकी, सार्वजनिक सेवा, नागरी सेवा, व्यापार आणि औद्योगिकी अशा विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी प्रदान केले जातात. प्रत्येक भारतीय नागरिक या पुरस्कारांसाठी पात्र आहेत.

सरकार सर्व नागरिकांना स्वत:चे नामांकन करण्यासाठी आणि इतर योग्य व्यक्तींच्या शिफारसी सादर करण्याचे आवाहन करते, विशेषत: स्त्रिया, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांग, आणि निस्वार्थ सेवा देणाऱ्या व्यक्तींच्या शोधासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन यामाध्यमातून करण्यात आले आहे. नामांकन सादर करताना, व्यक्तीच्या उल्लेखनीय कार्याची माहिती ८०० शब्दांपर्यंतच्या वर्णनात नमूद करणे आवश्यक असल्याचे गृह मंत्रालयाने त्यांच्या बातमी पत्रात म्हटले आहे. यासंबंधी अधिक माहिती केंद्रीय गृह मंत्रालयाच्या संकेतस्थळावर तसेच पद्म पुरस्काराच्या पोर्टलवर उपलब्ध आहे.

# जीवनात पुढे जाण्यासाठी दृष्टी असली पाहिजे-जल संधारण अधिकारी मानसी जोशी

**वडिलांचे छत्र हरवलेल्या मानसीने घेतली झेप**

**पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने कर्तृत्वाचा गौरव**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गुणगौरव हा प्रेरणा व ऊर्जा देण्यासाठी असतो शैक्षणिक गुणवत्तेतूनच जीवनाचा विकास होतो सर्वांगीण विकास साधून जीवनात पुढे जाण्यासाठी दृष्टी असावी लागते असे मत धाराशिव येथील जलसंधारण विभागातील अधिकारी मानसी जोशी यांनी व्यक्त केले.



जलसंधारण विभागात वर्ग दोन अधिकारीपदी मानसी जोशी यांची निवड झाल्याबद्दल येथील पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने मानसी जोशी यांचा गौरव करण्यात आला त्यावेळी सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या. आपल्या मार्ग दर्शनपर मनोगतात त्यांनी सांगितले की पालकांनी पाल्यासोबत गुणवत्ते संबंधी चर्चा केली पाहिजे आणि विद्यार्थ्यांनी देखील जिद्द, चिकाटीने शिक्षण घेतल्यास घवघवीत यश प्राप्त होते समाजाच्या चांगुलपणासाठी योगदान देणाऱ्या कार्य कतृत्वाचा गौरव करण्यासाठी पेशवा प्रतिष्ठान सारख्या संस्था आहेतच ही काळ्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बीजोत्सवाला लाखो भाविकांची मांदियाळी

देहूगाव । प्रतिनिधी

राज्यभरातून दाखल झालेल्या लाखो भाविकांच्या साक्षीने आज श्रीक्षेत्र देहूत सथ तुकाराम महाराज यांचा सदेह वैकुंठगमन सोहळा पार पडला. गोपाळपूरा येथील वैकुंठगमन मंदिराच्या आवारात दुपारी सव्वा बारा वाजता राज्याच्या कानाकोपर्यातून आलेले लाखो भाविक भक्त,भाविकांनी मनोभावे अभिवादन करीत नांदुरकीच्या वृक्षावर बुक्का,तुळशी -पानफुले उधळण करीत हा सोहळा पहायला मिळाल्याने जीवन धन्य झाल्याची भावना व्यक्त करीत माघारी फिरले.



जगद्गुरू श्री संत तुकोबारायांची जन्म,कर्म,योग भूमी असलेल्या देहूनगरीत गत आठवडाभर दिंड्या,भाविक वारकरी दाखल होत होते.परिसरामध्ये ठिकठिकाणी अखंड हरिनाम,भजन, कीर्तन ,गाथा पारायण, सप्ताह सुरू असल्याने भक्तिमय वातावरण झाले होते.दिंड्याच्या फडावर शनिवारी रात्रभर जागर, पहाटे काकड आरती,महापुजा,हरिपाठ आणि वीणा-टाळ - मृदंगाच्या गजरात भजन किर्तन व हरिनामाच्या जयघोष सुरू होता. राज्याच्या कानाकोपर्यातून बीज सोहळ्यासाठी आलेल्या भाविकांनी रविवारी (दि.१६) पहाटे पासूनच पांडूरंगाच्या व श्री संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिरात आणि गोपाळपूरा येथील वैकुंठगमन मंदिरात दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.वैंकुठगमन मंदिराच्या परिसरात जागा मिळेल तेथून हा सोहळा दृष्टीस पडेल अशा ठिकाणी बसण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

श्री संत तुकाराम महाराज मुख्य मंदिरात व बीज सोहळ्याच्या धार्मिक कार्यक्रमाला पहाटे तीन वाजल्यापासून काकड आरतीने सुरुवात झाली. श्रीं ची आरती, श्री विठ्ठल रुखमाई, शिळा मंदिर,पालखी सोहळ्याचे जनक तपोनिधी नारायण महाराज यांच्या समाधीची महापूजा, वैकुंठगमन मंदिरातील श्री संत तुकाराम महाराजांची महापूजा संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, विश्वस्त संजय महाराज मोरे,संतोष महाराज मोरे,अजित महाराज मोरे ,माणिक महाराज मोरे,भानुदास महाराज मोरे, विशाल महाराज मोरे ,वंशज यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली.संस्थानच्या वतीने मंदिराच्या गाभार्यात, भजनी मंडपात,मुख्य मंदिर परिसरात प्रवेशद्वारात आणि गोपाळपूरा येथील श्री संत तुकाराम महाराज मंदिर आणि नांदुरकीच्या झाडाखालील पारावर फुलांची आकर्षक सजावट तर रंगीत विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

वारकरी भाविक भक्तांच्या दर्शनार्थ मंदिर २४ तास सुरू ठेवण्यात आल्यामुळे पहाटेच्या नैमित्तिक महापूजे नंतर भाविकांना मुख्य मंदिरात,शिळामंदिर व वैकुंठगमण मंदिरात दर्शनाला सोडण्यात आले.सकाळी मंदिरातील सर्व विधीवत पूजा उरकल्यानंतर सकाळी पावणे अकराच्या सुमारास पालखीचे मानकर्यांनी चोपदार नामदेव गिराम यांच्या सुचनेनंतर पालखी खांद्यावर घेत पुंडलिका वरदा हरि विठ्ठल नामाचा जयघोष करीत वारकर्यांसह शिंगाडे, सनई चौघडा व ताशाच्या गजरात पालखी मुख्य मंदिराच्या महाद्वारातून बाहेर पडताच पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली.पालखी पुढे परंपरेप्रमाणे संबळ,गोंधळी,चौघडा, शिंगवाले, ताशा,अब्दागिरी, गरूड टक्के,पताका तर जरीपटका वाले सहभागी झाले होते .पालखी पुढे मानकरी दिंडीसह मोठ्या लवाजम्यासह पालखीचे मुख्यमंदिरातून वैकुठगमण मंदिराकडे प्रस्थान झाले.

पालखी बाराच्या सुमारास वैंकुठगमन मंदिराच्या आवारात प्रदक्षिणा घालुन येथील नांदुरकीच्या वृक्षाखाली आली.येथे देहूकर महाराज यांचे सकाळी दहाच्या सुमारास परंपरे प्रमाणे श्री संत तुकाराम महाराजांच्या वैंकुठगमण प्रसंगावरील घोटवीन लाळ, ब्रम्हज्ञानी हाती । मुक्त आत्मस्थिती सोडविन ।। या अभंगावर किर्तन सुरू होते.

# शिक्षकांसाठी पाच दिवसीय कार्यशाळा



पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व दिल्लीतील एनसीईआरटी, परख यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते २१ मार्च या कालावधीत इयत्ता नववी ते बारावीच्या शिक्षकांसाठी यशदा येथे पाच दिवसीय कार्यशाळा घेण्यात येणार आहे. शिक्षकांचे समृद्धीकरण करण्याच्या अनुषंगाने ही कार्यशाळा महत्त्वाची ठरणार आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन केंद्रीय शालेय शिक्षण व साक्षरता विभागाचे अतिरिक्त सचिव आनंद पाटील यांच्या हस्ते होणार आहे. शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, विद्या प्राधिकरण संचालक राहुल रेखावार, परखचे विभागप्रमुख डॉ. इंद्राणी भादुरी आदी उपस्थित असणार आहेत. विवेक गुप्ता, विशाल पंजनकर, आनंद कृष्णास्वामी, डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. शिवानी लिमये, श्रीधर नागरगोजे, सुवर्णा देशपांडे आदी मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेसाठी शिक्षण संचालक शरद गोसावी, संपत सूर्यवंशी, डॉ. महेश पालकर, कृष्णकुमार पाटील, राज्यमंडळ सचिव देविदास कुलाळ आदी उपस्थित राहणार आहेत.

केंद्र स्तरावर देशातील सर्व बोर्डांना समान पातळीवर आणण्याचे प्रयत्न सुरू असून, ही कार्यशाळा समग्र प्रगतिपत्रक माध्यमिक स्तर व प्रश्नपत्रिकांचे प्रमाणीकरण या विषयावर होणार आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ वरही चर्चा होणार आहे. विविध राज्यांच्या प्रश्नपत्रिकांच्या तुलनात्मक अभ्यासावरही या कार्यशाळेत प्रकाश टाकला जाणार आहे. राज्य मंडळाकडून निर्माण केल्या जाणाऱ्या प्रश्नपत्रिका अधिकाधिक अचूक व उच्चतम दर्जाच्या व्हाव्यात, या दृष्टीने या कार्यशाळेस अधिक महत्त्व आहे. भविष्यातही विविध बोर्ड समान पातळीवर आल्यास महाराष्ट्र राज्य शैक्षणिकदृष्ट्या अग्रेसर राहावे, असा प्रयत्न या कार्यशाळेच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# पाकिस्तानमध्ये परवाना नसलेले सौंदर्यप्रसाधने विक्रीसाठी पिंपरी चिंचवडमध्ये! मोठी कारवाई, खटला दाखल होणार

पुणे । प्रतिनिधी

पाकिस्तानच्या लाहोरमध्ये तयार झालेले व कोणत्याही प्रकारचा आयातीचा परवाना नसलेले सौंदर्यप्रसाधनांचा साठा पिंपरी चिंचवडमधील औषधाच्या दुकानात सापडला असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. पाकिस्तानमधील होरीक केमिस्ट्री कंपनीकडून उत्पादित करण्यात आलेल्या या सौंदर्यप्रसाधनाच्या साठ्यावर उत्पादकाचे नाव नाही. विक्रेत्याकडे आयात - निर्यात करण्याचे कोणतेही परवाने नाहीत.



दरम्यान, हा साठा नष्ट करण्यात आला असून संबंधितांवर खटले दाखल करण्यात येणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी सोमवारी अधिवेशनात दिली. याबाबत खडकवासला मतदार संघाचे आमदार भीमराव तापकीर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जप्त केलेल्या सौदर्यप्रसाधनाविषयी प्रश्न उपस्थित केला होता.

धायरी येथे प्रतिबंधित केलेल्या साठ्याच्या कारवाईबाबत मंत्री झिरवळ म्हणाले की, धायरीमध्ये मे. घर सोप्स, प्रायव्हेट लिमिटेड या सौंदर्य प्रसाधन पेढीच्या उत्पादन परवान्याबाबत शंका आल्याने त्यांचा २० लाख ७२ हजार ४८७ किमतीचा साठा प्रतिबंध करण्यात आला आहे. हा साठा कर्नाटक, तेलंगणातून आला होता.

त्या विक्रेत्यांकडे सौंदर्य प्रसाधने विक्रीची परवानगी आहे. मात्र कर्नाटक आणि तेलंगणा येथील सौंदर्यप्रसाधानाबाबत परवानगी नव्हती त्यामुळे त्या उत्पादनांना प्रतिबंध करण्यात आला. राज्यात ७४० परवानाधारक असून त्यापैकी पुण्यात ५४ आहेत. पुण्यात केलेल्या कारवाईतील सौंदर्यप्रसाधने ही कर्नाटक व तेलंगणा येथील आहेत. त्या उत्पादनांना परवानगी नसल्याने संबंधित राज्यांना तसे कळविलेले आहे. विक्रेत्यांविरूदध अधिवेशन संपण्यापूर्वी खटले दाखल केले जातील. दरम्यान महाराष्ट्रात या सौंदर्य साठ्याची तपासणी करणाऱ्या किती प्रयोगशाळा आहेत, किती उत्पादक आहेत, त्यांच्यावर आतापर्यंत किती कारवाई झाल्या आदी प्रश्नही आमदार तापकीर यांनी विचारले असता त्याबाबत मंत्री झिरवळ यांना उत्तर न देता आल्याचे दिसून आले.

# बरं झालं पक्ष फुटला, स्वत:च्या बायकोच्या गाडीत बंदूक ठेवणाऱ्या व्यक्तीसोबत मी काम करु शकले नसते; सुप्रिया सुळेंचा धनंजय मुंडे यांच्यावर हल्लाबोल

पुणे । प्रतिनिधी

धनंजय मुंडे यांच्याविरोधात ते पक्षात असतानाही माझी लढाई सुरु होती. मला कधी कधी वाटतं, बरं झालं पक्ष फुटला. कारण या सगळ्या प्रकारानंतर एकतर ते तरी पक्षात राहिले असते किंवा मी तरी पक्षात राहिले असते. जिथे हा माणूस असेल त्या पक्षात मी काम करु शकत नाही. ते पक्षात असतानाही माझी त्यांच्याविरोधात लढाई सुरु होती, असे वक्तव्य शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे (र्डीींळूर डींश्रश) यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. सुप्रिया सुळे यांची या कार्यक्रमातील ऑफ द रेकॉर्ड भाषणाची ऑडिओ क्लीप सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



या ऑडिओ क्लीपमध्ये सुप्रिया सुळे यांनी अनेक धक्कादायक वक्तव्यं केली आहेत.

सुप्रिया सुळे यांनी धनंजय मुंडे यांचे थेट नाव न घेता म्हटले आहे की, जो माणूस स्वत:ची पत्नी, मुलांची आई असलेल्या महिलेच्या गाडीत बंदूक ठेवू शकतो, अशा पुरुषासोबत मी काम करु शकत नाही. मी आज याबाबत पहिल्यांदा बोलत आहे. मी विरोधी पक्षात आयुष्य काढेन पण नैतिकता सोडणार नाही. माझं घर कंत्राटाच्या पैशांवर चालत नाही, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले. बीड येथील संतोष देशमुख आणि महादेव मुंडे यांची घरी भेट एकदा तरी जाऊन या. तुम्हाला कळेल, काय परिस्थिती आहे. महादेव मुंडेंच्या पत्नीने मला विचारलं की, टया सगळ्यात माझ्या लेकरांची काय चूक होती?' या प्रश्नावर मी काय उत्तर देणार? संतोष देशमुख यांच्या घरी गेले होते तेव्हा त्यांच्या आईने माझा हात धरला होता. आम्हाला न्याय देशील, असा शब्द दे सुप्रिया, असे त्यांनी म्हटले. मी त्यांना संतोष देशमुख यांना न्याय देण्याचा शब्द देऊन आले, असे सुप्रिया सुळे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या पुढाकारामुळे भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आले होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असताना धनंजय मुंडे हे अजित पवार यांचे भक्कम पाठीराखे म्हणून ओळखले जात होते. शरद पवार यांच्याविरोधात अजितदादांनी पुकारलेल्या बंडातही धनंजय मुंडे यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांच्यावरच आता सुप्रिया सुळे यांनी थेट हल्ला चढवल्याने राजकारण तापण्याची शक्यता आहे. या सगळ्यावर आता अजितदादा गटातून काय प्रतिक्रिया येणार, याकडे साऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

# भरधाव जीपची कारला धडक; एक गंभीर, ११ जण किरकोळ जखमी

पळसदेव । प्रतिनिधी

यात्रेसाठी निघालेल्या भरधाव पिकअप जीपची कारला पाठीमागून जोराची धडक बसली. या अपघातात पिकअप पलटी होत फरपटत गेल्याने त्यातील १२ जण रस्त्यावर फेकले गेले. सुदैवाने जीवितहानी टळली. या अपघातात एकजण गंभीर जखमी असून बाकीचे किरकोळ जखमी झाले आहेत. इंदापूर तालुक्यातील पळसदेव-काळेवाडी हद्दीत पुणे-सोलापूर महामार्गावर सोमवारी (दि. १७) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. जखमींची नावे समजू शकली नाहीत. त्यांना भिगवण व इंदापूर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.



लोणी देवकर येथील यात्रेसाठी दौंड येथून १२ जण पिकअप जीप (एमएच ४२ एम ४६१६) मधून निघाले होते. तर (एमएच ४२ के ८६८६) ही कार देखील सोलापूरच्या दिशेने जात होती. पळसदेव, काळेवाडी हद्दीत दोन्ही वाहने आली असता भरधाव पिकअप जीपवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने जीप कारला पाठीमागून जोरात धडक बसली. त्यानंतर ८० ते ९० फूट घसरत गेली, त्यामुळे जीपमधील १२ जण रस्त्यावर फेकले गेले. यामध्ये एकजण गंभीर जखमी झाला. तर अन्य ११ जणांना किरकोळ दुखापत झाली. सुदैवाने जीवितहानी टळली. या अपघाताची माहिती मिळताच तत्काळ इंदापूर व डाळज महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना स्थानिकांच्या मदतीने रुग्णवाहिकेतून इंदापूर व भिगवण येथील रुग्णालयात उपचारासाठी पाठविले. अपघातातील जखमींची नावे समजू शकली नाहीत. ती रात्री उशिरापर्यंत घेण्याचे काम पोलिसांकडून सुरु होते.

# बोरी येथे दोन बिबट्याची पिल्ले जेरबंद

आळेफाटा । प्रतिनिधी

बोरी बुद्रुक (ता.जुन्नर) येथील ज्ञानेश्वरनगर येथे दोन बिबट्यांची पिल्ले पिंजऱ्यात जेरबंद झाली. ही घटना रविवारी (ता.१६) घडली.

वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार, येथील ज्ञानेश्वर नगरमध्ये बिबट्यशाचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. यामुळे येथे वनविभागाने

चारणबाबा मंदिर परिसरात शांताराम बाळाजी कोरडे व प्रसाद कोरडे (मेजर) यांच्या शेतात शुक्रवारी (ता. १४) ग्रामस्थांच्या पुढाकाराने पिंजरा लावला होता. दरम्यान, श्रीमंता कोळीमामा हे शेतात पाणी भरण्यासाठी गेले असता त्यांना पिंजऱ्यात दोन पिल्ले अडकल्याचे दिसले. याबाबतची माहिती लगेच वन अधिकाऱ्यांना दिली. यानंतर वनविभागाने त्वरित घटनास्थळी भेट देत बिबट्याची पिल्ले माणिकडोह वन निवारा केंद्र या ठिकाणी हलवण्यात आले आहे.

दरम्यान, या ठिकाणी पिल्लांची आई आणि नर त्याचबरोबर अजून एक पिल्लू फिरताना दिसत आहे, असे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले आहे.यामुळे याच ठिकाणी दुसरा पिंजरा लावून मादीला जेरबंद करून, असे आश्वासन वनविभागाने ग्रामस्थांना दिले आहे. यावेळी चरण सेवा मंडळाचे अध्यक्ष विश्वस्त तसेच ग्रामस्थ यांनी मोठे सहकार्य केले, अशी प्राथमिक माहिती शैलेश कोरडे यांनी दिली.

# शरद पवारांचे धाकटे बंधू प्रतापराव पवार यांच्या पत्नीचे निधन; पवार कुटुंबावर दु:खाचा डोंगर

पुणे - राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे धाकटे बंधू उद्योगपती प्रतापवराव पवार यांच्या पत्नी भारती पवार याचे पुण्यात निधन झाले आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी पोस्ट करत याबाबत माहिती दिली आहे. शरद पवार आणि प्रतापराव पवार हे सख्खे बंधू आहेत. भारती पवार यांच्या निधनाने पवार कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

भारती पवार या गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होत्या. त्या जवळपास दीड वर्षांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर उपचार सुरु होते. उपचारादरम्यान आज त्यांची प्राणज्योत मालवली.



सुप्रिया सुळे यांची पोस्ट - अतिशय दु:खी अंत:करणाने कळविते की, माझ्या काकी भारती प्रतापराव पवार यांचे थोड्या वेळापूर्वी निधन झाले. ही आम्हा सर्वांसाठी अतिशय दु:खद घटना आहे. याक्षणी काकींच्या असंख्य आठवणींनी मनात घर केले आहे. त्या माझ्यासाठी आईसमान होत्या. त्यांनी आम्हा सर्व भावंडांवर सदैव खुप प्रेम केले. आम्हा सर्व भावंडांना त्यांनी दिलेली प्रेमळ साथ सदैव लक्षात राहील.काकी, भावपूर्ण श्रद्धांजली.

# ...तर माळेगाव कारखान्याची निवडणूक लढवावी लागेल - युगेंद्र पवार

बारामती । प्रतिनिधी

मागील दोन्ही निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांनी आम्हाला मोठी साथ दिली. आमच्याकडे ना संस्था आहेत, ना सत्ता, ना पैसा आहे. तरीही पक्षफुटीनंतर कार्यकर्ते सोबत राहतात, ही सोपी गोष्ट नाही. कार्यकर्त्यांची इच्छा असेल, तर आम्हाला ठामपणे त्यांच्यामागे उभे राहावे लागेल.

सक्षम उमेदवार मिळत असतील आणि 'माळेगाव'चा 'छत्रपती' होऊ द्यायचा नसेल तर निवडणूक लढवावी लागेल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते युगेंद्र पवार यांनी व्यक्त केले. बारामतीत ते पत्रकारांशी बोलत होते.'माळेगाव'चे अध्यक्ष केशवराव जगताप यांनी आंदोलनावर केलेल्या टीकेचा युगेंद्र पवार यांनी समाचार घेतला. ते आंदोलन आमच्या पक्षाचे नव्हते, तर आंदोलनाला आम्ही पाठिंबा दिला होता. सर्वपक्षीय सभासद आंदोलनात होते. त्यात 'माळेगाव'च्या अध्यक्षांनी राजकारण आणू नये, असे युगेंद्र पवार म्हणाले. कामगारांना पगार वेळेवर मिळत नाहीत, रसायनयुक्त पाणी नदीत सोडले जात आहे. उसाला योग्य दर दिलेला नाही. कधीतरी एकदा चांगला दर दिला, तेच सातत्याने सांगितले जात आहे. मग 'छत्रपती'ने देखील १५ वर्षांपूर्वी चांगला दर दिला होता, तेच सांगायचे का? असा सवाल युगेंद्र यांनी केला. माळेगावच्या कार्यक्षेत्रातील खांडज ग्रामपंचायतीने दूषित पाण्यासंबंधी ठराव केला आहे. मी तेथे भेट दिली. दूषित पाणी शेतीला दिल्याने, पिल्याने कर्करुग्ण वाढत आहेत. मासे मृत्युमुखी पडत आहेत. शेतकर्यांच्या उसाचे टनेज घटत आहे, असे ते म्हणाले.

'माळेगाव'चे अध्यक्ष माझ्या शरयू कारखान्याच्या दराबाबत बोलले. माझा कारखाना ज्या तालुक्यात आहे, तिथे आम्ही क्रमांक एकचा दर देत आहोत. तो सहकारी नव्हे तर खासगी कारखाना आहे. कर्ज काढून मी तो कष्टाने चालवत आहे. त्यांचे (उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा नामोल्लेख न करता) सात-आठ खासगी कारखाने आहेत. मी जर बोलायला लागलो, तर मग त्यांना ते जड जाईल, त्यामुळे 'माळेगाव'च्या अध्यक्षांनी हा विषय वाढवण्यापेक्षा थांबवावा, असे युगेंद्र पवार म्हणाले.

# ज्येष्ठ दाम्पत्याला सुखद धक्का; परत मिळाले अकरा लाखांचे दागिने

पुणे । प्रतिनिधी

मध्य प्रदेशातील ज्येष्ठ दांपत्य पुणे रेल्वे स्थानकावर उतरले. तेव्हा बॅगेतील साडेअकरा लाखांचे दागिने चोरीस गेल्याचे लक्षात आले. मौल्यवान दागिने चोरीस गेल्याने त्यांच्या पायाखालची वाळू सरकली. पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांनी चोरट्यांना शोधून काढण्याचा आदेश दिला. लोहमार्ग पोलिसांनी पुणे रेल्वे स्थानकासह हरियानापर्यंत दीडशेहून अधिक सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. खबऱ्याची मदत घेत पोलिसांनी चोरट्याला अटक केली. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून दहा लाख ९३ हजार रुपयांचे दागिने जप्त केले. हे दागिने ज्येष्ठ दाम्पत्याला परत मिळवून दिल्याने त्यांना सुखद धक्का बसला.




याबाबत ज्येष्ठ नागरिकाने (वय-७३, रा. आनंदपुरा, देवास, मध्य प्रदेश) लोहमार्ग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. सुमीतकुमार सतवरसिंह (वय-३०, रा. सुलतानपुरी, दिल्ली, मूळ रा. भवानी खेडा, हरियाना) असे अटक केलेल्याचे नाव आहे. अन्य एका आरोपीचा पोलिस शोध घेत आहेत. सविस्तर माहिती अशी की, देवासमधील ज्येष्ठ दांपत्य १३ जानेवारीला इंदूर-पुणे रेल्वेतून प्रवास करत होते. पुणे रेल्वे स्थानकावर बॅगेतून साडेअकरा लाखांचे दागिने चोरीस गेल्याचे लक्षात आले. त्यांनी लोहमार्ग पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिस अधीक्षक तुषार दोशी, अतिरिक्त अधीक्षक रोहिदास पवार, उपविभागीय अधिकारी बिपिन हसबनीस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद खोपीकर यांनी तपास सुरू केला.

पोलिसांनी रेल्वे स्थानक परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. त्यात दोघा चोरट्यांपैकी एकजण साधू वासवानी पुलाच्या दिशेने गेला होता. त्यानंतर ते घोरपडीत एकत्रित दिसून आले. पोलिसांना तपासात एक लिंक सापडली. चोरट्यांचे वर्णन देशभरातील रेल्वे पोलिसांना कळविण्यात आले. बंगळूर रेल्वे पोलिसांनी एकाला सात वर्षांपूर्वी ताब्यात घेतले होते. या माहितीवरून पोलिस हरियानात दाखल झाले. परंतु तो तेथे आढळून आला नाही.

दुसरा आरोपी सुमीतकुमारची मैत्रीण दिल्लीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याठिकाणी पोलिस निरीक्षक प्रमोद खोपीकर, पोलिस उपनिरीक्षक यशवंत साळुंके, कदम, दांगट, टेके, बिडकर, केंद्रे, वाघमारे सात दिवस दबा धरून होते. त्यांना चोरट्याचा मिळताजुळता चेहरा असलेला तरुण दिसला. पोलिसांनी त्याला सुमीतकुमार अशी हाक मारली. त्याने वळून पाहताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याला घोरपडी रेल्वे यार्ड परिसरात आणून चौकशी केली. त्याच्याकडून दहा लाख ९३ हजार रुपयांचे दागिने जप्त केले. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून ज्येष्ठ दाम्पत्याला ते दागिने परत करण्यात आले. दागिने परत मिळाल्याने ज्येष्ठ दाम्पत्याला आनंद झाला. त्यांनी पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांच्यासह लोहमार्ग पोलिसांचे आभार मानले.